# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, २८ जून २०२४

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २९४

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 28 JUNE 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-294 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05




महाराष्ट्रभर पाऊस झाल्याने बळीराजाची पेरणीची लगबग सुरू आहे. धाराशिव जिल्ह्यात पेरणी झाल्यानंतर सोयाबीन बियांची अंगी हत्तीचे बळ घेऊन उगवण्याची धडपड पाहून बळीराजाच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे. छायाचित्र : सचिन कोरडे

# राज्याच्या अर्थव्यवस्थेत ७.६ टक्क्यांची वाढ अपेक्षित

## अजित पवारांकडून महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल सादर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्याच्या विधानसभेचे पावसाळी अधिवेशन गुरूवारपासून सुरू झाले आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आर्थिक वर्ष २०२३-२४ चा महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला. या अहवालानुसार महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ७.६ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर देशाच्या अर्थव्यवस्थेतही ७.६ टक्क्यांची वाढ होण्याची अपेक्षा आहे. राज्याच्या कृषी तसेच कृषीपुरक क्षेत्रातही १.९ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे.**

या आर्थिक पाहणी अहवालानुसार राज्याच्या कृषी व संलग्न क्षेत्राचा एकंदरीत विचार करता पिकांच्या विभागात १.५ टक्के घट होऊ शकते, असे म्हटले आहे. तर, वनसंवर्धनात ९.२ टक्के, मासेमारी व जलसंवर्धनात २.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. उद्योग क्षेत्रात ७.६ टक्के, वस्तू निर्मिती क्षेत्रात ७.५ टक्के, बांधकामात ६.२ टक्के, राज्याच्या व्यापार, दुरुस्ती, हॉटेल्स व उपहारगृहे, वाहतूक, साठवण व दळणवळण, तसेच प्रसारणाशी संबंधित सेवा क्षेत्रांत ६.६ टक्के, वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवांमध्ये १०.१ टक्के वाढ अपेक्षित आहे, सार्वजनिक प्रशासन, सुरक्षा व इतर सेवांमध्ये ७.६ टक्के, तर सेवा क्षेत्रात ८.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. या आर्थिक वर्षात राज्याच्या आर्थिक विकासात सेवा क्षेत्राचा सर्वात मोठा (६३.८ टक्के) वाटा असून त्याखालोखाल उद्योग (२५ टक्के) क्षेत्राचा नंबर लागतो. कृषी व संलग्न कार्यांमध्ये ११.२ टक्के वाढीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गेल्या दशकभराचा विचार करता राज्याच्या विकासात सेवा क्षेत्राचा सरासरी ५७.१ टक्के हिस्सा असून त्याखाली उद्योग (३०.९ टक्के) क्षेत्राचा नंबर लागतो. तर, कृषी आणि इतर संलग्न क्षेत्रांची १२ टक्के हिस्सेदारी आहे. २०२३-२४ चं राज्याचे उत्पन्न ४०.४४ लाख कोटी रुपये असून त्यामध्ये आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या तुलनेत १०.९ टक्के वाढ अपेक्षित आहे.

**मुख्यमंत्री पंचतारांकीत शेती करतात :** अधिवेशन सुरू झाले असून विरोधकांनी शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरुन सरकारला लक्ष्य केले. उद्धव ठाकरे यांनीही शेतकऱ्यांना त्वरीत कर्जमाफी द्यावी, अशी मागणी करत मुख्यमंत्री शिंदेंवर हल्लाबोल केला. शेतकऱ्यांची दयनीय अवस्था कथित करताना होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर ठाकरेंनी भाष्य केले. मुख्यमंत्री पंचतारांकीत शेती करतात. राज्यातच नाही, देशात असा दुसरा शेतकरी नसेल, असे म्हणत मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केले.

**बहुमताच्या जोरावर पळ काढू नका :** तेलंगणाप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांनाही कर्जमाफी जाहीर झाली पाहिजे तसेच जुनी पेन्शन योजना लागू करावी अशी मागणी नाना पटोले यांनी आहे. हे अधिवेशन महायुती सरकारचे निरोपाचे अधिवेशन असून जनतेला हिशोब देण्याची वेळ आहे, तो हिशोब द्यावा लागेल. जबाबदार विरोधी पक्ष म्हणून जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सभागृहात प्रश्न मांडू, सरकारमध्ये हिम्मत असेल तर प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करावी, बहुमताच्या बळावर पळ काढू नये, असा इशारा नाना पटोले यांनी दिला आहे.

# वीज पडून चकलांबा येथील तीन महिला ठार


## एक महिला गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**गेवराई :** सर्वत्र सध्या खरिपाची लागवड आणि खुरपणीचे दिवस असून ग्रामीण भागातील महिला वर्ग सध्या शेतीच्या कामात गुंतलेला आहे. गुरूवारी दिवसभर वातावरणात बदल झाल्यामुळे ढग दाटून येत असताना विजेच्या कडकडाटासह काही ठिकाणी जोरदार पाऊस झाला. चकलांबा या ठिकाणी सायंकाळच्या दरम्यान सोसाट्याचा वारा, विजेचे कडकडाटांसह पाऊस पडत असताना शेतातील काम करणाऱ्या महिलांच्या अंगावर वीज पडून तीन महिला जागीच ठार तर एक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. याबाबत समजलेली माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील सर्वत्र शेतकरी महिला वर्ग कामात गुंतलेला असून थोड्याफार प्रमाणात पडलेल्या पावसामुळे अनेकांनी कापूस, तूर, सोयाबीन व अन्य पिकांची लागवड केली असून पिके जोमात असताना रिमझिम पडलेल्या पावसामुळे शेतात गवत निर्माण झाले आहे. शेतकरी वर्ग शेतात पाळी, फवारणीचे काम करत आहे तर महिलावर्ग खुरपणीचे काम करत असताना चकलांबा परिसरात दुपारपासूनच विजांचा कडकडाट सुरू झाला होता. महिला कामात गुंग असताना सायंकाळी साडेपाचच्या सुमारास चकलांबा परिसरात वीज पडल्याने शालनबाई शेषराव नजन (वय ६५) यांची सुन लंका हरिभाऊ नजन (वय ४०) तर विजुबाई बाळासाहेब खेडकर (वय ४१) अशी वीज पडून मयत झालेल्या महिलांचे नाव आहेत. या तिन्ही महिला शेतात काम करत असताना सायंकाळी साडेपाच वाजता त्यांचा जागेवरच वीज पडून मृत्यू झाला. या तिनही महिला चकलांबा येथील रहिवासी असून त्यांना बीडच्या शासकीय रुग्णालयात दाखल केल्या असता त्यांना जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले आहे. यामध्ये यमुना माणिक खेडकर (वय ६५) या गंभीर जखमी असून त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

आपण घरात नियमितपणे योगासने, प्राणायाम करीत आहोत ही अतिशय चांगली गोष्ट आहे. पण घरातील लहान नातू किंवा नात त्याच वेळी आपल्याला तिच्यासोबत खेळण्याचा आग्रह करते आहे. अशा वेळी नाक मुठीत धरून प्राणायाम करीत बसण्यापेक्षा थोडं तिच्यासोबत खेळलं तर त्या खेळातूनही व्यायाम आणि प्राणायाम घडू शकतो. अशा वेळी थोडं जलद चाला, थोडं धावा, थोड्या उड्या मारा, थोडी गाणी गा. व्यायामही घडेल आणि प्राणायामही. प्रत्येकच वेळी फार गंभीर राहण्याची आवश्यकता नाही. आपल्यातही एक लहान मूल दडलेलं असतंच ! त्या मुलाला व्यक्त व्हायला यापेक्षा दुसरी उत्तम संधी ती कोणती ? आपल्यातील अव्यक्त बालकाला व्यक्त होण्याची ही संधी नक्कीच आपला आनंद द्विगुणित करील आणि आपल्याला तरुण राहायला मदत करेल.
परवाच्या दिवशी रेडिओवर योगगुरू हंसाजी यांची मुलाखत लागली होती. त्यांनी एक फार सुदंर किस्सा सांगितला. त्या एके दिवशी जुहू बीचवर फिरत असताना एक प्रसिद्ध अभिनेत्री पण तिथे चालण्याचा व्यायाम करण्यासाठी आली होती. तिचे लहान मूल तिच्यासोबत आलेली आया सांभाळत होती. ते मूल रडत होते. अशा वेळी त्याला आईची गरज असणार. पण ती आई हातात वजन घेऊन चालण्याचा सराव करीत होती.







## गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## सेवेकऱ्याचे महत्व स्वत:पेक्षाही जास्त वाढवतात श्री स्वामी महाराज !

श्रध्देने नामस्मरण करण्याने मनात शंका येत नाहीत ही स्थिती फार भाग्याची पण दुर्मिळ असते. श्रध्देने, निष्ठेने नामस्मरण करणे म्हणजे शंकारहित स्मरण करणे. शंका अनेक प्रकारच्या असतात. नामस्मरण करतांना श्री स्वामी समर्थ महाराजांकडे लक्ष नसले तर नामस्मरणाचा उपयोग होईल की नाही, बैठक कोणती असावी, शुचिर्भूतच असावे का? थोडक्यात आपण नामस्मरण करतो ते महाराजांपर्यंत पोहोचते की नाही? श्री स्वामी महाराज आणि त्यांचे नाव, मंत्र एकच असल्याने त्या दोहोंच्या आड काही येऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तिच्या पाठीमागून आपण चाललो असताना त्याचे नाव उच्चारले तर ती व्यक्ति मागे वळून पाहते. ही स्थिती जशी मनुष्याची तशीच परब्रम्हाची. खरे म्हणजे, श्री स्वामींचे नाव त्यांच्याच कृपेने आपल्या मुखात येते, म्हणजे त्यांचे नाव तेच घेतात. समजा, दोन माणसे जेवायला बसली त्यापैकी एक लक्षपूर्वक जेवण करतो आहे तर दुसरा जेवण करताना वेगवेगळा विचार करीत आहे. जेवण करून उठल्यावर दोघांचीही पोटे भरतीलच पण लक्षपूर्वक जेवणारा अधिक समाधानी होईल. त्याचप्रमाणे निष्ठेने नामस्मरण करणा-या व्यक्तीचे असते. अखंड समाधान हे नामस्मरणाचे गमक आहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

६) वटसिद्ध नागनाथ समाधीः हैद्राबाद - परळी रेल्वे महामार्गावर हे तीर्थक्षेत्र येते. लातुर जिल्ह्यापासुन २५ कि. मी. अंतरावर चाकुर



तालुक्यात वडवळ हे गांव आहे. येथे वटसिद्ध नागनाथांची संजिवन समाधी आहे. येथे फार जुन्या पद्धतीचे मंदिर आहे. ७) गहिनीनाथ समाधीः जालिंदरनाथ येवलेवाडीहून सरळ रस्त्याने डोंगरकिन्ही येथे जाऊन हातोला फाट्यामार्गेकुसळंब मार्गे चांचोलीला जावे. किंवा बीड - पिंपळवडी - कुसळंब मार्गे चिंचोली, किंवा जामखेडहून चिंचोलीला जावे. येथे गहिनीनाथांचे भव्य असे प्राचीन समाधी मंदिर आहे.
८) गोरक्षनाथ समाधीः सौराष्ट्रात काठेवाडी प्रातांत जुनागड जिल्ह्यात गिरनार पर्वतावर गोरक्षनाथ सेवेत आहेत. राजकोटहून जुनागड अंदाजे १०० कि. मी. अंतरावर आहे. गिरनारहून द्वारकाधाम प्रभासपाटन तीर्थरूप (सोरटी सोमनाथ) जाता येते. गिरनारच्या गोरख टोकावर लहानशा मंदिरात गोरक्षनाथांची पाषाणाची मुर्ती आहे. नेपाळ प्रांतात गुरू गोरखनाथ बसलेले आहेत. म्हणून तेथील रहिवाशांना गोरख किंवा गुरखा म्हणतात. महाराष्ट्रामधे नगर तालुक्यात डोंगरगण या ठिकाणीही मंदिर आहे. श्री चैतन्य गोरक्षनाथ, गर्भगिरी पर्वत अहमदनगर-वांबोरी रस्त्यावर डोगरगण येथुन मांजरसुंबा याठिकाणी गर्भागिरी पर्वतावर श्री गोरक्षनाथ गड आहे. या ठिकाणी श्री गोरक्षनाथांनी काही काळ वास्तव्य केले होते. हिरवाईने नटलेल्या डोंगरावर नाथांचे सुंदर मंदिर आहे. येथे श्री गोरक्षनाथांची काळ्या पाषाणाची प्राचीन स्वयंभू मुर्ती आहे. याठिकाणी दरवर्षी कार्तिक शुद्ध त्रयोदशीला गोरक्षनाथ प्रगट दिन सोहळा साजरा होतो. या दिवसाचे अनन्य साधारण महत्व आहे. डोंगरगण सह महाराष्ट्रात विविध भागात हा सोहळा साजरा होतो. या दिवशी आपल्या घरी देखिल नाथांची पुजा करुण नाथकृपेचा लाभ आपण घेऊ शकता. या दिवशी आपल्या घरी श्री नवनाथांची प्रतिमा वस्त्राने स्वच्छ पुसुन केशरी गंध लावावा. फुले अर्पण करुण हार घालावा. त्यानंतर धुप व तुपाचा दिवा लावावा. नैवद्यासाठी मलिदा अर्पण करावा. प्रतिमा पुजा नंतर आसनावर बसुन एकाग्र चित्ताने "ॐ चैतन्य गोरक्षनाथाय नमः" या मंत्राचा १०८ वेळेस माळ जप करावा व नवनाथ भक्तिसार या ग्रंथातील गोरक्षनाथांचा जन्मकथा असलेला ९ वा अध्याय वाचावा नंतर आरती करावी. गाईला नैवद्य द्यावा व सर्वांनी प्रसाद घ्यावा शक्य असल्यास यथाशक्ती अन्नदान करावे. श्री गोरक्षनाथांची जन्मकथा
श्री सदगुरु मच्छिंद्रनाथ महाराज तीर्थयात्रा करीत फिरत असता बंगालात चंद्रगिरी गावास गेले. तेथे सुराज म्हणून एक ब्राह्मण होता. त्याच गावात सर्वोपदयाळ या नावाचा एक वसिष्ठगोत्री गौडब्राह्मण रहात असेल. तो मोठा कर्मठ होता. त्याच्या स्त्रीचे नाव सरस्वती. ती अति रूपवती असून सद्‌गुणी असे; पण पुत्रसंतती नसल्याकारणाने नेहमी दिलगीर असे. त्या घरी मच्छिंद्रनाथ भिक्षेकरिता गेले. त्यांनी अंगणात उभे राहून 'अलख' शब्द केला आणि भिक्षा मागितली.



आधुनिक केसरी

### भक्तांचा जीवात्मा | विटेवरी ||


भक्ती भाव ज्याचा | झाला एकरूप ||
जाण ते स्वरूप | अर्जुनाचे ||१||
विराट दर्शन | लाभले जयासी ||
गीता तत्व त्यासी | सांगितले ||२||
ज्ञानवंत वीर | कीर्तीवंत पार्थ ||
शिष्य ऐसा सार्थ | दुजा नाही ||३||
धर्माच्या रक्षणा | सारथ्य स्विकारी ||
विषाद आवरी | अर्जुनाचा ||४||
स्वधर्मा जागवी | कृष्ण परमात्मा ||
भक्तांचा जीवात्मा | विटेवरी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

चीरकाल कुम्भक करे,
तब सुषमन परवाह ।
अल्पकाल रत भेद में, सुषमन पर गम
आह ।।२१ ।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
नवम अध्याय) ०२/०९/२१
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
हठयोगात चिरकाल कुंभक केल्या नंतर सुष्मन गती होते, परंतु विहंगम योग साधने द्वारे अल्प काळातच सुष्मन प्रवाह होऊ लागतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मित्रांनो आपण एकविसाव्या शतकात वावरणारी माणसं आहोत. हवं गरम होतेय म्हणलं की आपण पंखा,कुलर,एसी लावतो. पाऊस आला तर त्या पासून रक्षण करतो थंडी वाजली तर शाल,स्वेटर घालून आपल्या शरीराचं रक्षण करतो. एवढंच काय रूम हिटने घर गरम पण करू शकतो. ही सर्व वायुची रूपे आहेत. वायु ची रूपे आपल्याला त्यांच्यातील खेळ अशा प्रकारे दाखवतात. विश्वाच्या व्यवहारात जिकडे तिकडे शक्तिचा खेळ चाललेला आहे. आपण ह्या व्यक्तिच्या खेळात बाहुले आहोत. विश्वातील ज्या शक्ति आहेत त्यांच्या पुढे कुणाचाही तोरा चालत नाही. म्हणुन निसर्गाची सतत आठवण ठेवा त्याला त्रासहोईल असे वागणे बंद करा. झाडी लावा बेसुमार डोंगर तोडणे बंद करा,नदीत, समुद्रात रासायनीक पाणी सोडून देणे बंद करा शक्ति ही अनादी अनंत आहे.

## परमार्थ हे कृतीचे शास्त्र आहे

आधुनिक केसरी

एकदा जनक राजाच्या घरी एक विद्वान् आला, आणि आपण आल्याची वर्दी त्याने राजाला पाठविली. ‘ आता राजा आपली पूजा करील ’ असे त्याच्या मनात आले. हा त्याचा भाव समजून जनक राजाने निरोप पाठविला की, ‘ आपण एकटेच यावे. ’ त्याप्रमाणे, आपण अभिमानाचे गाठोडे बाहेर ठेवून मगच रामाकडे जावे; तसेच सद्‌गुरूच्या घरीही आपले भांडवल बाजूला ठेवूनच जावे. ‘ मी कोण ’ याची जाणीव जोपर्यंत राहते तोपर्यंत दुजेपण आलेच. अभिमान वाढविण्याकरिता देवाकडे नाही जाऊ. दुसऱ्याचे वाईट व्हावे असे आपल्याला वाटले की आपला अभिमान वाढीला लागला आहे असे जाणावे. पोरांबाळांवर जितके प्रेम करता तितके प्रेम भगवंतावर करावे. आपली आणि भगवंताची इच्छा एकच होणे, हे परमार्थाचे सूत्र आहे. भगवंताची जी इच्छा तीच आपली करावी, आणि आनंदात रहावे. अगदी निःस्वार्थबुद्धीने केलेले कर्तव्य कधी वाया जात नाही. एखाद्या सावकाराकडे कोणाचे दागिने गहाण असले, तर त्याने आपल्या घरच्या लग्नामध्ये ते वापरणे



हा अन्याय आहे. त्याचप्रमाणे, आपली मुलेबाळे ही देवाने आपल्याजवळ दिली आहेत, त्यांचे रक्षण करावे; ते कर्तव्य होईल. पण त्यांच्या ठिकाणी आपलेपणा ठेवून सुखदुःख भोगणे हे मात्र पाप आहे. संन्याशाने भगवे वस्त्र धारण केल्यावर त्याचा थोडा तरी परिणाम बुद्धीवर होतोच. त्याचप्रमाणे आपण भजनपूजन करू लागल्यावर त्याचा परिणाम आपल्यावर दिसला पाहिजे. जो शहाणा असेल त्याने समजून, आणि जो अडाणी असेल त्याने श्रद्धेने, बंधने पाळावीत. स्वतःच्या मताबद्दल आपल्याला पूर्ण खात्री असावी, त्यात घोटाळा असू नये. मनाने आपण खंबीर झाले पाहिजे. ज्याप्रमाणे पांढरा कपडा मळण्याचा जास्त संभव असतो, त्याप्रमाणे सत्कर्माला विघ्ने फार येतात; त्यांना न जुमानता आपण सत्कर्म करावे. आचार आणि विचार ही दोन्ही जुळली म्हणजे उच्चारही तसाच येतो.
नारळात पाणी जितके गोड तेवढी खोबऱ्याला चव कमी; तसे, जेवढी विद्वत्ता जास्त तेवढी निष्ठा कमी. फार वाचू नका; जे काही थोडे वाचाल त्याचे मनन करा; आणि ते कृतीत आणा. जसे वडिलांचे पत्र वाचल्यावर आपण त्यातल्या मजकुराप्रमाणे कृती करतो, तशी ग्रंथवाचनाच्या समाप्तीनंतर कृतीला सुरुवात करावी. परमार्थ हे सर्वस्वी कृतीचेच शास्त्र आहे. समाधान आणि आनंद हे त्या शास्त्राचे साध्य आहे. भगवंताच्या स्मरणात कर्तव्य केले की जीवनात आनंद उत्पन्न होतो.
**१८०. सर्व काही करावे । पण खरे प्रेम साधनावर असावे ॥**

## निरूपण

आधुनिक केसरी

जैसे पक्षी दाही दिशा । उडोन जाती ॥ ३९ ॥
तैसें वैभव हें सकळ । कोण जाणे कैसी वेळ ।
पुत्रकळत्रादि सकळ । विघडोन जाती ॥ ४० ॥
पाहिली घडी नव्हे आपुली । वयसा तरी निघोन गेली ।
देह पडतांच ठेविली- । आहे नींच योनी ॥ ४१ ॥
स्वान शुकरादिक नीच याती । भोगणें घडे विपत्ती ।
तेथे कांहीं उत्तम गती । पाविजेत नाहीं ॥ ४२ ॥
मागा गर्भवासीं आटाटी । भोगितां जालासि रे हिंपुटी ।
तेथुनियां थोरा कष्टीं । सुटलासि दैवें ॥ ४३ ॥
दुःख भोगिलें आपुल्या जीवें । तेथें कैचिं होतीं सर्वें ।
तैचेंचि पुढें येकलें जावें । लागेल बापा ॥ ४४ ॥
कैंचि माता कैंचा पिता । कैंचि बहिण कैंचा भ्राता ।
कैंचीं सुहृदें कैंची वनिता । पुत्रकळत्रादिक ॥ ४५ ॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २८ जून २०२४
adhunikkesari.com

# जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळास राज्यस्तरीय पुरस्कार

## प्रसिद्ध अभिनेत्री किशोरी शहाणे, कवी अनंत राऊत यांच्यासह सचिव सागर जाधव यांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शिक्षक पॅनल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात संभाजीनगर येथील जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाला उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल राज्यस्तरीय गौरव पुरस्काराने नाशिक येथील गुरुदक्षिणा भवन येथे हा सन्मान सोहळा पार पडला.

राज्यातील तेहतीस जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या सत्कार मूर्तींना यावेळी सन्मानित करण्यात आले. जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ यांचे शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक कार्याबद्दल राज्यस्तरीय गौरव पुरस्काराने सन्मानितकरण्यात आले. गरजवंताना, वंचिताना नेहमीच सहकार्य करत असतात. कोरोना काळातील कार्याबद्दल अन्नदान देणे, गोरगरीबांना किराणा सामान वाटप, गरजूवंताना व रुग्णांना आर्थिक सहाय्य, ज्येष्ठांसाठी विविध आरोग्यविषयक मोफत शिबिर, रक्तदान शिबिराचे भव्य आयोजन विद्यार्थ्यांसाठी शालेय उपयोगी वस्तूची मदत आदी कार्य या शैक्षणिक संस्थेकडून सुरुच आहे. त्यांच्या या कार्यांची दखल घेवून सन्मान करण्यात आला. जिजामाता परीवाराच्या वतीने संस्थेचे सचिव सागर जाधव यांना अभिनय क्षेत्रातील प्रसिद्ध मराठी अभिनेत्री किशोरी शहाणे, कवी अनंत राऊत यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. हा सन्मान सोहळ्यासाठी सुप्रसिद्ध अभिनेत्री किशोरी शहाणे, कवी अनंतराव राऊत अध्यक्ष दिपक चामे, सतीष कोळी, गिरीश दारुंटे, नितिन वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.



# ज्येष्ठ पत्रकाराबद्दल अपशब्द; भाजपच्या पूनम पवारांविरुद्ध पत्रकार एकवटले

## धर्माबादचे पत्रकार संघटनेचे प्रशासनास निवेदन



आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** नगर परिषद सभागृहात दिनांक २६ जून रोजी आयोजीत जनता दरबारात आ. राजेश पवार यांनी धर्माबादमधील आवश्यक असलेल्या विकासात्मक कामांबाबतीत जनतेकडून अपेक्षा जाणून घेण्यासाठी हा कार्यक्रम आयोजीत केला होता. सदरील कार्यक्रमात पत्रकारांचे प्रतिनिधि म्हणून बोलतांना जेष्ठ पत्रकार तथा मराठी पत्रकार संघाचे जिल्हा संघटक जी.पि मीसाळे यांनी धर्माबाद तालुक्यात रोजगार वाढावे, नविन उद्योग धंदे यावेत ही सार्वजनिक विकासाची अपेक्षा व्यक्त करीत उमरी तालुक्यात जेष्ठ शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरूजी यांनी साखर कारखाना, पतसंस्था, दुग्ध व्यवसाय उभे करून रोजगार वाढवले तसे धर्माबाद तालुक्यात का होत नाहीत असे मत मांडले. नेमकी हीच बाब आमदार राजेश पवार यांच्या अपयशाची ठरणारी दिसताच त्यांच्या पत्नी तथा भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष ग्रामीण सौ.पूनम राजेश पवार यांनी तुम्ही सुपारी घेऊन बोलत आहात का? असे म्हणत जेष्ठ पत्रकार जी.पी मिसाळे यांचा अवमान करणारे वक्तव्य केले. जनता दरबारात विकासात्मक विषयावर बोलणारे जेष्ठ पत्रकार जी.पी. मीसाळे यांचा झालेल्या अपमानाबद्दल धर्माबाद तालुक्यातील पत्रकार संघटनेचे अध्यक्ष, संपादक, सर्व पत्रकारांनी जाहीर निषेध करून उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे, पोलीस निरीक्षक तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन दिले आहे.

सौ पूनम पवार यांनी सर्व पत्रकारांची जाहीर माफी मागावी अशी प्रतिक्रिया यावेळी निवेदनात नमूद करण्यात आली. लक्ष्मण तुरेराव, पोतन्ना लखमावाड, बाबुराव पाटील, भगवान कांबळे, सतिश पा.शिंदे, शिवराज पा. गाडीवान, सुधाकर जाधव, मनोज बुंदेले, कृष्णा तीमापुरे, सुधर्शन वाघमारे, विजयालक्ष्मी सोनटक्के, गणेश वाघमारे, व्यंकटराव डोईवाड, सुरेश घाळे,माधव हणमंते, सौ.मीना भद्रे, गंगाधर धडेकर, गिरमाजी सूर्यकार, बाबुराव गोणारकर, लक्ष्मण पा. येताळे, गणेश पा.हतनूरे, गजानन वाघमारे, गणपत जटाळकर, गजानन चंदापुरे, सिद्धेश्वर मटपती, किशन कांबळे,गजानन कुलकर्णी, लालाजी इंमनेलू सर्व पत्रकार उपस्थित होते.

# वरतुनी मेघराजा उपकार तू करावा..!

## भोकर तालुक्यात दूबार पेरणीचे संकट : बळीराजा हवालदिल

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** पावसाळ्याच्या पहिल्या चरणात अधूनमधून पाऊस सरी कोसळल्या. हवामान विभागाने यंदा समाधानकारक पाऊस होणार अशी गोड बातमी दिल्याने बळीराजा सुखावला होता.मृगाच्या पाठोपाठ आर्द्रा नक्षत्रात थोडाफार पाऊस झाल्याने खरीपाच्या ५० टक्के पेरण्या झाल्या आहेत.मागील चार दिवसांपासून पावसाने अचानक डोळे वटारल्याने शेतकरी हवालदिल झाला असून दूबार पेरणीचे संकट घोंगावत आहे. ओल मातीतील कोंब पावसा अभावी क्षीण झाली आहे. वर्तूनी मेघराजा उपकार तू करावा.. कष्ठाळु शेतकऱ्यांचा भोग तो सरावा" अशी याचना भेदरलेल्या शेतकऱ्यांकडून वरूणराजाला केली जात आहे.

तालुक्यातील बहुतांशी भागातील शेतकऱ्यांची भिस्त पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. निसर्ग वेळेवर साथ देत नसल्याने खरीप हंगामातील पीकांचे नूकसान होत आहे. सिंचनाची वाणवा असल्याने त्याचा फटका शेतीउत्पादनाला बसतो आहे. यंदा पावसाळ्यात समाधान कारक पाऊस होणार असे भाकीत हवामान विभागाने केले होते. पण त्याचा अंदाज चूकल्याने खरिपाच्या पेरण्या खोळंबल्या आहेत. रोहणी, मृग नक्षत्रात



हलक्या सरी कोसळल्या असून आणखी पाऊस पडेल या आशेनी खरीपाच्या पन्नास टक्के पेरण्या झाल्या आहेत.ऊर्वरीत शेतकऱ्यांनी अद्याप पेरणी केली नाही. सध्या पावसाने ओढ दिल्याने उगवलेली कोवळी कोंबे उकाड्याने क्षीण झाली आहेत. पाऊस लांबल्याने दूबार पेरणीचे संकट घोंगावत आहे. आज पर्यंत केवळ ९८ टक्के पाऊस झाला आहे.पिकासाठी आणखी मोठ्या पावसाणी अपेक्षा आहे.

# उपचाराअभावी ४ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** अचानक प्रकृती खालावल्यानंतर वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने उपचाराअभावी ४ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. आर्यन अंकित तलांडी (४, रा. कोरेली ता. अहेरी) असे मृत बालकाचे नाव आहे. ही घटना २४ जून रोजीची असून तीन दिवसांनंतर उघडकीस आली. यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित केल्या जात आहे. अहेरी तालुक्यातील कोरेली या दुर्गम येथील रहिवासी असलेले अंकित तलांडी यांच्या आर्यन या ४ वर्षीय मुलाची २३ जून रोजी मध्यरात्री प्रकृती खालावली होती. त्याला पोटदुखीचा त्रास होता. दरम्यान, मध्यरात्री पाच किमी लांब असलेल्या पेरमिली आरोग्य केंद्रात त्याला उपचारासाठी नेण्यात आले. त्यावेळी उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आर्यनवर प्राथमिक उपचार केले. त्यानंतर आर्यनला पालकांनी घरी कोरेलीला परत नेले. २४ जूनला पहाटे त्याला अधिक त्रास होऊ लागल्याने त्याला पुन्हा पेरमिली आरोग्य केंद्रात नेण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला अहेरी येथे नेण्यास सांगितले. परंतु वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने पालक आर्यनला घेऊन बसने अहेरीसाठी निघाले.

# दारुची अवैध विक्री; अप्पर पोलीस अधीक्षक महामुनींनी स्वामिनींना दिला दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**बुलढाणा :** जिल्ह्यातील साखरखेर्डा पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या वडगाव माळी गावात गेल्या अनेक दिवसांपासून खुलेआम दारुची अवैध विक्री सुरू आहे. त्यामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत असून गावात दारूबंदी करावी या मागणीसाठी महिला थेट अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या दालनात धडकल्या. वारंवार मागणी करुनही दारूबंदी होत नसल्याने आज 26 जूनला संतप्त झालेल्या गावातील महिलांनी अप्पर पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयावर धडक दिली. यावेळी निवेदन देण्यात येऊन महिलांनी आपली कैफियत मांडली. त्यांना अप्पर पोलीस अधीक्षक बीबी महामुनी यांनी देखील प्रतिसाद देत थेट दारूबंदी करण्याचे संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना फार्मान सोडले. मेहकर तालुक्यातील वडमाळी येथे गावठी व देशी दारू खुलेआम विकली जात आहे. या धंद्यांना गावात ऊत आला आहे. अनेक कुटुंबातील कर्ता पुरुष व्यसनाधीन होत असल्याने महिलांना व लहान मुलांना त्रास होत आहे. तसेच विद्यार्थी व तरुणाई देखील दारुच्या व्यसनाला बळी पडत आहेत. या अवैध धंद्यांच्या विरोधात कारवाई व्हावी म्हणून गावातील महिला अखेर पोलिसांकडे आल्या. 'आमच्या येथील दारूविक्री बंद करा' अशी मागणी यावेळी त्यांनी केली.गावात अवैध दारू सहज उपलब्ध होत असल्यामुळे गावामधील शांतता भंग होऊन गरीब व मध्यमवर्गीयांचे संसाराचा आर्थिक बजेट विस्कळीत होउन महिलांना कुटुंबाचा चरितार्थ चालविणे कठीण झाल्याची समस्या कथन केली. दरम्यान अप्पर पोलीस अधीक्षक बीबी महामुनी यांनी त्यांना धीर देत गावातील दारूबंदीसाठी तत्काळ साखरखेर्डा पोलिसांना कार्यवाहीसाठी भ्रमणध्वनीवरून संवाद साधला.



## काँग्रेसची कोंडी

आधुनिक केसरी

संविधान धोक्यात आल्याचा आरोप करणाऱ्या काँग्रेसला संपूर्णपणे बेसावध गाठून केंद्र सरकारने बुधवारी लोकसभेत आणीबाणीचा निषेध करणारा प्रस्ताव आणला. लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी हा प्रस्ताव मांडून आणीबाणीविरोधी लढ्यात बळी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दोन मिनिटांचे मौन पाळण्यासही सदस्यांना सांगितले. भाजपने 'गुगली' टाकून डाव उलटविल्याचे लक्षात आल्यानंतर विरोधकांनी याविरोधात घोषणाबाजी केली. गदारोळात कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. लोकसभाध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा निवड झाल्यानंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बिर्ला यांचे अभिनंदन करताना संविधानाच्या रक्षणाची जबाबदारी त्यांची असल्याची आठवण करून दिली होती. मात्र अभिनंदनाचा प्रस्ताव आणि पंतप्रधानांनी मंत्रिमंडळाचा परिचय करू दिल्यानंतर बिर्ला यांनीच अचानक आणीबाणीचा निषेध करणारा प्रस्ताव मांडला. 'आणीबाणीच्या काळ्या दिवसांचे हे ५० वे वर्ष आहे. आणीबाणीने देशातील अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त केले, कित्येकांचा मृत्यू झाला. काँग्रेसच्या हुकूमशाही सरकारच्या हातून प्राण गमावलेल्या कर्तव्यदक्ष व देशभक्त नागरिकांच्या स्मरणार्थ दोन मिनिटे मौन पाळू या, असे आवाहन बिर्ला यांनी केले. त्यावर सत्ताधारी बाकांवरील सदस्य दोन मिनिटे स्तब्ध उभे राहिले. तत्पूर्वी सुमारे १० मिनिटांच्या प्रस्तावात बिर्ला यांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी आणि काँग्रेसवर जोरदार टीका केली. २५ जून १९७५ मध्ये आणीबाणी लादण्याच्या निर्णयाचा हे सभागृह तीव्र निषेध करते. ज्यांनी आणीबाणीला विरोध केला, लढा दिला आणि भारताच्या लोकशाहीचे रक्षण करण्याची जबाबदारी पार पाडली त्या सर्व लोकांच्या निर्धाराचे आम्ही कौतुक करतो, असे बिर्ला म्हणाले. आणीबाणी लागू झाल्यानंतर तत्कालीन मंत्रिमंडळाने निर्णयाला मान्यता दिली होती. अगणित बलिदानानंतर मिळालेल्या या दुसऱ्या स्वातंत्र्याचा पुनरुच्चार करण्यासाठी संसदेमध्ये ठराव मंजूर करणे गरजेचे आहे, असे प्रस्तावामागील कारण बिर्लांनी दिले. भारतात लोकशाही मूल्ये आणि वादविवादाला नेहमीच पाठिंबा दिला गेला आहे. अशा देशावर इंदिरा गांधींनी हुकूमशाही लादली. भारतातील लोकशाही मूल्ये चिरडली गेली आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा गळा घोटला गेला', अशी टीका लोकसभाध्यक्षांनी केली. तप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजप नेत्यांनी या प्रस्तावाचे स्वागत केले. तर कोंडी झालेल्या काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी प्रस्तावावर चर्चा व्हायला हवी होती, अशी अपेक्षा व्यक्त केली. लोकसभाध्यक्षांचे अभिनंदन करताना विरोधी पक्षांनी निष्पक्ष कारभाराची अपेक्षा बाळगली होती. पण, लोकसभाध्यक्षांनी सभागृहात चर्चा न झालेला मुद्दा उपस्थित केला व त्यामुळे संघर्ष निर्माण झाल्याची टीका थरूर यांनी केली.

## प्रवेश घ्या अन् पास व्हा, संस्थाचालकांचा हमी बाँड

आधुनिक केसरी

राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

**केवळ बीड जिल्ह्याचे चित्र नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्र आणि देशाचे चित्र शैक्षणिकदृष्ट्या चिंताजनक बनलं असं म्हटलं तर अतिशयोक्ती ठरणार नाही. एकीकडे नविन शैक्षणिक धोरण अंगीकृत होत असताना दुसरीकडे गुणवत्तेची ऐशी की तैशी, तुम्ही फक्त दाखला देवुन जा, पास व्हायची हमी आम्ही देतो अशा प्रकारचा अलिखित बाँड शिक्षण संस्था चालक विद्यार्थ्यांना देत असल्याने नविन प्रकार उघडकीस अनेक वर्षापासुन आला तरी यावर कुणी काही बोलायला तयार नाही. मात्र समोर आलेले चित्र भयानक असुन 11वीच्या प्रवेशाअभावी शहरातील नामांकित महाविद्यालय बंद पडणार की काय?**

अशी स्थिती तर दुसरीकडे गावखेड्यातली महाविद्यालये प्रवेशाने मंजुर तुकड्यापेक्षाही जास्त खचाखच भरलेली दिसतात. शहरात कॉप्या चलत नाहीत आणि खेड्यातले महाविद्यालय मुलांना पास करून दाखवण्याची हमी देत असल्याने जन्मदाता बापच दाखल्याची पिशवी घेऊन खेड्यातल्या महाविद्यालयाची पायरी चढताना दिसतो. दहावी पासचा दाखला हवाली करायचा, दुसरीकडे मुलाला कुठंतरी हाताखाली काम करायला लावायचं अन् बिनबोभाट 12 वी पासचा जणु काही मार्क म्हणुन घेवुन जायचे असं विदारक चित्र आहे. या साऱ्या घोटाळ्यात गुणवत्तेची ऐशी की तैशी. मात्र मुला-मुलींच्या भविष्याचं काय? हा देखील प्रश्न असुन रेगुलर कॉलेज केलं तर कृतीतुन गुणवत्तेत होणारी वाढ आणि कागदावरची वाढ यात कमालीचा फरक ज्यामुळे मुलांचं करिअर देखील बर्बाद होवु शकतं. जुन महिना सुरू झाला की शेतकऱ्यांना ज्याप्रमाणे खरीपाच्या पेरण्याची घाई असते, त्याप्रमाणे हा महिना शैक्षणिकदृष्ट्या महत्वाचा म्हणुन ओळखल्या जातो. कारण शाळा, महाविद्यालये याच कालावधीत सुरू होतात. मे अखेरीस दहावी, बारावीचे निकाल लागतात. मग मुलं कॉलेजला प्रवेश घेतात. एक काळ असा होता की, ग्रामीण भागातील मुलं कॉलेज शिकण्यासाठी शहरात यायचे, आहे त्या व्यवस्थेत निवासी रहायचे. खचाखच कॉलेज भरलेले दिसायचे. चार-पाच वर्षे गुणवत्तापुर्णक ज्या शाखेत शिक्षण घेतो तिथे पुर्ण करायचे आणि मग स्वावलंबी जीवनाचा मार्ग देखील वाढलेल्या गुणवत्ता बुद्ध्यांकाच्या आधारावर सापडायचा. कॉपी प्रकार शहरातल्या काही महाविद्यालयात ज्या संस्था केवळ शैक्षणिक उद्देशापोटी चालतात, तिथे होतच नाही. मात्र जिथे शिक्षणाचा बाजार मांडलेला असतो, आपलं कॉलेज केवळ कागदोपत्री चालत, एव्हाना प्राचार्य, शिक्षक, प्राध्यापकाचा पत्ताही नसतो. संस्था चालक ढुंकुनही बघत नाहीत. संस्था केवळ आर्थिक लाभापोटी चालवल्या जातात, अशा कॉलेजात कॉप्यांचा महापुर आलेला दिसतो. मात्र नामांकित शिक्षण संस्था जिथे प्राधान्य केवळ गुणवत्तापुर्ण शिक्षणाला कॉप्या वगैरे विषय इथे होतच नाही. महाविद्यालय ज्या उद्देशापोटी चालवल्या जातं, ते परिपुर्ण होवु शकतं. तिथं मात्र कॉपी नावाचा राक्षस जन्माला आलेला दिसत नाही. बीड जिल्ह्यात अशा काही अपवादात्मक संस्था आजही आहेत, ज्या संस्थेत कॉप्या चालत नाहीत, आणि पालकांचा विश्वास प्रचंड असतो. कॉप्या



चालत नाहीत त्यामुळे आपला पाल्य नापास होतो अशा अपप्रवृत्तीची धारणा केवळ विद्यार्थ्यांच्या मनात नव्हे जन्मदात्या बापाच्या मनातही उत्पन्न झालेली अलीकडच्या काळात जास्तीची दिसते. परिणामी कुठल्या महाविद्यालयात कॉप्या जास्त होतात? हा शोध घेवुनच बाप लेकरं प्रवेश घेतात एवढं दुर्दैव वर्तमान स्थितीत शिक्षण क्षेत्रात पुढे आलेले दिसतं. म्हणजे आपला मुलगा शिक्षण घेवुन पास झाला नाही तरी चालेल मात्र कधीच कॉलेजात जावुन दिवा लावला नाही पण परीक्षेत मात्र पास झाला. यावर पालक देखील जास्तीचा भर देताना दिसतो. या सर्व कारणामुळे चिंताजनक चित्र शिक्षण क्षेत्रात पुढे येताना दिसतं. दहावी पास झालेल्या मुलांचा ओढा खऱ्या अर्थाने ग्रामीण भागात पडक्या घरात सुरू असलेल्या महाविद्यालयाकडे 100 टक्के जास्तीचा दिसतो. कारण फक्त कॉपी चलती म्हणुन. अजुन एक शैक्षणिक सुविधा ऐकल्यानंतर आश्चर्याचा धक्का बसण्याची गरज नाही. कारण तशा प्रकारचे चित्र सर्वत्र डोळ्यांनी पहायला मिळतं. तुम्ही फक्त शाळा सोडल्याचा दाखला आमच्याकडे द्या आणि बारावी पासचा दाखला घेवुन जा. पोरगा फक्त परीक्षेला पाठवा.(बरं झालं परीक्षा तरी देणं बंधनकारक) कदाचित मागे पुढे म्हणा किंवा त्याच्या हेच्या जागेवर कुणीतरी परीक्षा देतच असेल त्यातही आम्ही मागे नाहीत. या सर्व बरबादी प्रवृत्तीमुळे शहरातल्या महाविद्यालयासाठी एव्हाना नामांकित विद्यार्थी संख्या 25 टक्यावर आली. तेही प्राध्यापक संच मान्यतेसाठी रानोमाळ प्रवेशासाठी मुलं हुडकीत बसले म्हणुन. कदाचित अपेक्षित संख्या मिळाली नाही तर कला, वाणिज्य, विज्ञान अनेकांच्या तुकड्या बंद होवुन सरप्लस प्राध्यापक होण्याचा रेटा खुप वाढलेला दिसतो. ग्रामीण भागातल्या महाविद्यालयात प्रवेश घेवुन ठेवायचा हे 100 टक्के आता पालकांच्याही लक्षात आलं. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे मुलगा शहरात ठेवला उदा. लातुर, अंबाजोगाईला तर तो फक्त खासगी शिकवणी घेईल. प्रवेश मात्र उदा. घाटनांदुर, बर्दापुर, बनसारोळा, आपेगाव, होळ अशा महाविद्यालयात राहिल आणि पहायला मिळत असलेले चित्र तसंच आहे. कारण बारावी परीक्षा 100 टक्के पास होण्याची खात्री ग्रामीण भागातील संस्थाचालक देतात. तोंडी नव्हे मागितलं तर बाँडवर विद्यार्थी पासची खात्री पालकाला लिहुन देण्याची तयार ग्रामीण संस्थाचालकांची दिसते जिथे कॉप्या चालतात त्यांची. अपवाद ग्रामीण मध्ये देखील काही महाविद्यालये कॉपीमुक्त चालत असतील तो भाग वेगळा पण 90 टक्के टिशी घाला आणि मार्कमेमो पासचा घेवुन जा अशाच घोषणा कानावर पडताना दिसतात. या चिंताजनक परिस्थितीला जबाबदार कोण? एवढेच नाही तर असं चित्र अजुन चार-पाच वर्षे राहिलं तर गुणवत्ता केवळ हवेतल्या फुक्यासारखी डोके मात्र रिकामी मग स्वावलंबी जीवन तरूणांचं उभा तरी कसं राहणार? कारण अलीकडे गुणवत्ताधारक मुलांना राजकिय वशिला नाही लावला तरी नौकऱ्या मिळणार याची खात्री 100 टक्के आहे. आमचा मुलगा 12 वी पास झाला, त्याने 85 टक्के मार्क घेतले. बापाचं समाधान, आईला लेकरू पास झाल्याचं समाधान, पुढे काय करायचं? कुठंच नंबर लागला नाही म्हणुन पुन्हा आर्ट, फिर्ट या साऱ्या शैक्षणिक गोंधळात नाही म्हटलं तर 47 टक्के मुलांच्या भविष्याचा बट्याबोळ निश्चितच वाजलेला दिसणार. खऱ्या अर्थाने पालकांनी जागं होण्याची गरज वाटते. ग्रामीण भागात कॉपीच्या आधारावर तुमचा मुलगा पास झाला पण त्याच्या हुशारीचा उपयोग शेतीबाडीसाठीच होवु शकतो. कारण शैक्षणिक गुणवत्ता कृतीशील उपक्रमातुन आल्यानंतर व्यक्तीमत्व विकास निश्चित होवु शकतो. परीक्षा आल्या की सरकार कॉपीमुक्त यंत्रणा राबवते. पण भ्रष्ट शिक्षण व्यवस्थेतील अधिकारी देखील या साऱ्या बरबादीला जबाबदार म्हणावे लागतील. ग्रामीण भागातील वाढलेल्या तुकड्यांची संच मान्यता असेल किंवा कागदावरच्या सवलती असतील शिक्षणाधिकारी एकदाही ग्रामीण महाविद्यालयाला भेट देत नाहीत. त्यामुळे महाविद्यालय केवळ परीक्षेच्या काळात चालु असलेले दिसतात. याची संख्या ग्रामीण भागात नाही म्हटलं तरी 52 टक्केच्या अधिक आहे. म्हणुन राज्य सरकारने नविन पिढी गुणवत्तापुर्ण सुधारण्यासाठी ग्रामीण भागातील अकरावी, बारावी महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन करण्याची काळाची गरज वाटते. एवढेच नव्हे तर अशा प्रकारे कॉप्यांचा बाजार त्यावर आधारित कॉलेज आणि वाढलेली विद्यार्थी संख्या याला आळा घालण्याची गरज नक्कीच आहे.

## उथळ नाही तर समुद्रासारखं अथांग होता आलं पाहिजे

आधुनिक केसरी

गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

**जीवन हितार्थ अथांग अथवा विराट होता आलं पाहिजे. ओढयांना उथळपणा मुळे लवकर पुर येतो आणि तो संपुष्टात देखिल येतो.म्हणून उथळपणा हा जीवन हितकारक नसतो.हा सद्गुण नसून जीवन प्रभावीत करणारा अवगुण अहितकारक असल्याने या अवगुणापासुन स्वतःला दुर ठेवण्यासाठी स्वतः मध्ये अथांग वृत्ती विराटत्व धारण करा जेणेकरून जीवनातील प्रत्येक क्षेत्रात त्याचा आपल्याला योग्य उचित लाभ होऊन आपल हित होईल. जीवनाचं मर्म कळलं तर सत्य उमजत.आणि सत्य उमजलं तर जीवनात मान सन्मान अपमान,मोठेपणा छोटेपणा संपुष्टात येतो. मग आपोआप आपल्या मध्ये असणार विराट तत्व प्रकट होत.**

विराटत्व प्रकट होण्यासाठी जीवन असतं पण आपण ओढया नाल्यापलिकड जातंच नाहीत. उथळ आहे त्याला खळखळाट निश्चित असतो. म्हणून उथळ नाही तर अथांग विशाल होता आलं पाहिजे.जे उथळ असत त्याला खळखळाट असतोच तो नैसर्गिक आहे.जो अथांग असतो तो स्थिर शांत समुद्रा सारखा विशाल असतो.जीवनात नदी होणं कठीण नाही नदी कोणालाही होता येईल.पण समुद्र होणं खुप कठिण आहे. आयुष्याच्या वाटेवर आपण ज्या क्षेत्रात मार्गक्रमण करतोय त्या क्षेत्रात ओढ्या सारखं उथळ नाही तर समुद्रा सारखं विराट विशाल अथांग व्यक्तिमत्त्व निर्माण करा.ओढा होऊन खळखळाट करण्या ऐवजी अखंडित समुद्रा सारखं अथांग विशाल होता आलं तर जीवनाच कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. संकट ,वादळ, हि निसर्गाला चुकली नाहीत,चुकणार नाहीत.तर मग ती मानवाला कशी चुकणार.परंतु वादळाने ,संकटाने जो आपली शांतता भंग होऊ देत नाही तो म्हणजे समुद्र असतो त्याच प्रमाणे जीवन म्हटलं कि अनेक वेगवेगळ्या प्रकारची वादळं हि घोंगावणारच त्या मध्ये शंका नाही पण या वादळांना पुरून उरतो तो समुद्र समुद्राची शांतता हि निरंतर असते.अनेक वारे ,वादळ,पाऊस,नैसर्गिक, अनैसर्गिक संकटाचा समाना करताना देखील समुद्र आपली शांतता टिकवून ठेवतो.हा समुद्राचा सर्व उत्कृष्ट गुण आहे आणि हाच गुण आपण आपल्या जीवनात स्वीकारला पाहिजे. जेणेकरून आपल्या जीवनाला योग्य दिशा मिळेल.निसर्गा मध्ये अनेक वेगवेगळ्या प्रकारचे जीव सजीव आहेत.संकटं वादळ यांचा तडाखा निसर्गासह अनेक जीव सजीव यांना वारंवार बसत असतो.परंतु हि जी संकट,वादळ आहेत याचा प्रभाव झाल्यानंतर सुद्धा शांतता हि टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करता आला पाहिजे.समुद्रात अनेक प्रकारची वेगवेगळी वादळे निर्माण होतात.कधी नियोजित वादळं येतात तर कधी कधी अचानक नैसर्गिक बदलानुसार वादळ येतात.त्यातील काही वादळ लहान असतात आणि काही वादळ मध्यम तर कही वादळ हि भव्य आणि विराट स्वरूपाची असतात. परंतु या सगळ्या वादळाला समुद्र पुरूण उरतो.मात्र समुद्र कधीच आपली शांतता सोडत नाही किंवा आपल्या शांततेवर परिणाम होऊ देत नाही.मानवी जीवनात देखिल असंच काहीसं घडण अपेक्षित असतं तर काही अनपेक्षित देखिल घडत अथवा अनुभवास येत.म्हणून समुद्र आणि मानवी जीवन हे जवळपास सारखेच असलं पाहिजे.समुद्रात अनेक वादळं येऊन देखील तो आपली शांतता भंग होऊ देत नाही.तसंच मानवी जीवन आणि संकटं ,वादळ यांची मालिका हि सुरूच असते.वेगवेगळी संकट जेव्हा जीवनात आगमन करतात तेव्हा सगळ्यात प्रथम आपण आपली शांतता भंग होत असते. आणि शांतता भंग झाली कि मग मात्र वादळाने जेवढं नुकसान होणार नाही त्यापेक्षा जास्त आपलं नुकसान आपण आपली शांतता भंग झाल्याने करून घेतो.मुळात जीवन म्हटलं कि नदी सारखं नाही तर समुद्रा सारखंच असावं.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शाळेला प्रवेशद्वार देणारे संजय पवार यांचा सत्कार

## बचत गटाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज




**कळंब :** तालुक्यातील करंजकल्ला येथे दि.18 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गावातील शिक्षणप्रेमी नागरिक संजय नारायण पवार यांनी त्यांचे वडिल कै.नारायण तुकाराम पवार (गुरुजी) यांच्या स्मरणार्थ शाळेसाठी सिमेंट काँक्रीटचे सुमारे १.५ लक्ष रुपयांचे भव्य असे प्रवेशद्वार बांधून व रंगकाम करून त्यावर शाळेचे नाव टाकून दिले आहे. त्यामुळे शाळेची ईमारत व शाळेचा परिसर सुंदर आकर्षक दिसत आहे.तसेच प्रत्येक वर्षी वडिलांच्या स्मरणार्थ ११ हजार रुपये शाळेस भेट देणार आहेत. असे त्यांनी जाहीर केले त्यामुळे शाळेच्या विकासास व विद्यार्थी गुणवत्ता सुधारण्यास हातभार लागणार आहे.त्यांच्या या सामाजिक कौतुकास्पद कार्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोद पवार व शाळेचे मुख्याध्यापक भक्तराज दिवाने यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर बचत गट कळंब यांच्यावतीने शाळेतील पहिली ते आठवीच्या हुशार व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून शालेय साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान धाराशिव जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी माननीय दत्तात्रय लांडगे साहेब व एमपीएससी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद पुणे येथील डॉक्टर चंदन कुलकर्णी मूल्यमापन कार्यक्रम अधिकारी SCERT महाराष्ट्र पुणे. हे या कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. डॉ.चंदन कुलकर्णी यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना पाठ्यपुस्तके चार भागांमध्ये का केली आहेत? व त्यातील रिकाम्या पानांचा वापर कसा करावा.याबद्दल सखोल माहिती दिली. ही शाळा गुणवत्ताधारक असून विविध शालेय उपक्रम राबवत आहे. म्हणून या शाळेतील ८ वीचा वर्ग मी दत्तक घेतला असून त्यावर्गासाठी मी वर्षभर विविध शालेय उपक्रम घेणार आहे. असे सांगितले. तसेच उपशिक्षणाधिकारी श्री. दत्तात्रय लांडगे यांनी ही शाळा कळंब तालुक्यातील आदर्श शाळा असून या शाळेतील शिक्षक, गावातील ग्रामस्थ, पालक व शाळा व्यवस्थापन समिती या सर्वांच्या सहकार्यामुळे व योगदानामुळे ही शाळा दिवसेंदिवस नावारुपास येत आहे. प्रशासनाकडून आमचे सहकार्य सदैव त्यांना मिळत राहील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम ढेपे यांनी तर कार्यक्रमाचे आभार संघरत्न कसबे यांनी मानले. या कार्यक्रमास शाळेतील बाबू बोंदरे,बापू भंडारे,अखिल कुलकर्णी,अनिता रानभरे व स्मिता कुलकर्णी हे सर्व शिक्षक व शाळेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.अधिकाऱ्यांच्या हस्ते करंजकल्ला शाळेला प्रवेशद्वार देणारे संजय पवार यांचा सत्कार तर बचत गटाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप.

आज दिनांक 18/06/2024 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करंजकल्ला येथे गावातील शिक्षणप्रेमी नागरिक संजय नारायण पवार यांनी त्यांचे वडिल कै.नारायण तुकाराम पवार (गुरुजी) यांच्या स्मरणार्थ शाळेसाठी सिमेंट काँक्रीटचे सुमारे १.५ लक्ष रुपयांचे भव्य असे प्रवेशद्वार बांधून व रंगकाम करून त्यावर शाळेचे नाव टाकून दिले आहे. त्यामुळे शाळेची ईमारत व शाळेचा परिसर सुंदर आकर्षक दिसत आहे.तसेच प्रत्येक वर्षी वडिलांच्या स्मरणार्थ ११ हजार रुपये शाळेस भेट देणार आहेत. असे त्यांनी जाहीर केले त्यामुळे शाळेच्या विकासास व विद्यार्थी गुणवत्ता सुधारण्यास हातभार लागणार आहे.त्यांच्या या सामाजिक कौतुकास्पद कार्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोद पवार व शाळेचे मुख्याध्यापक भक्तराज दिवाने यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर बचत गट कळंब यांच्यावतीने शाळेतील पहिली ते आठवीच्या हुशार व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून शालेय साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान धाराशिव जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी माननीय दत्तात्रय लांडगे साहेब व एमपीएससी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद पुणे येथील डॉक्टर चंदन कुलकर्णी मूल्यमापन कार्यक्रम अधिकारी SCERT महाराष्ट्र पुणे.हे या कार्यक्रमास उपस्थित होते.त्यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. डॉ.चंदन कुलकर्णी यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना पाठ्यपुस्तके चार भागांमध्ये का केली आहेत? व त्यातील रिकाम्या पानांचा वापर कसा करावा.याबद्दल सखोल माहिती दिली. ही शाळा गुणवत्ताधारक असून विविध शालेय उपक्रम राबवत आहे. म्हणून या शाळेतील ८ वीचा वर्ग मी दत्तक घेतला असून त्यावर्गासाठी मी वर्षभर विविध शालेय उपक्रम घेणार आहे. असे सांगितले. तसेच उपशिक्षणाधिकारी श्री. दत्तात्रय लांडगे यांनी ही शाळा कळंब तालुक्यातील आदर्श शाळा असून या शाळेतील शिक्षक, गावातील ग्रामस्थ, पालक व शाळा व्यवस्थापन समिती या सर्वांच्या सहकार्यामुळे व योगदानामुळे ही शाळा दिवसेंदिवस नावारुपास येत आहे. प्रशासनाकडून आमचे सहकार्य सदैव त्यांना मिळत राहील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम ढेपे यांनी तर कार्यक्रमाचे आभार संघरत्न कसबे यांनी मानले. या कार्यक्रमास शाळेतील बाबू बोंदरे,बापू भंडारे,अखिल कुलकर्णी,अनिता रानभरे व स्मिता कुलकर्णी हे सर्व शिक्षक व शाळेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



## तीन ते आठ या वयोगटाचा पायाभूत स्तर बालकांसाठी फायदेशीर ठरणार : पल्लवी देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** शासनाच्या नवीन धोरणातील शैक्षणिक रचनेमध्ये तीन ते आठ या वयोगटाचा 'पायाभूत स्तर बालकांच्या सर्वांगीण विकासाला फायदेशीर ठरणार असल्याचे मत बालविकास प्रकल्प विभागाच्या कवठे बीटच्या पर्यवेक्षिका पल्लवी देशमुख यांनी व्यक्त केले. त्या आज शिरूर तालुक्यातील कवठे येमाई बीटमधील उपस्थित सर्व अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण,मार्गदर्शन कार्यक्रमात बोलत होत्या. स्वतंत्र भारताचे शिक्षणविषयक तिसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये जाहीर झाले. या धोरणातील नवीन दृष्टिकोन आणि शिफारशीमुळे सर्व राज्यांना शालेय शिक्षणाला नवसंजीवनी देण्याची संधी मिळाली आहे. महाराष्ट्र शासनाने यावर व्यापक विचारमंथन घडवून आणले. या धोरणातील अपेक्षांची सांगड राज्याच्या गरजांशी घालून हे धोरण साकार करण्याचा कालबद्ध कार्यक्रम राज्यात सुरू आहे. नवीन धोरणातील शैक्षणिक रचनेमध्ये तीन ते आठ या वयोगटाचा 'पायाभूत स्तर' या नावाने समावेश केला आहे. यात तीन ते सहा या बालशिक्षणाच्या वयोगटाचाही समावेश झाला आहे. हा बदल निश्चितपणे एक मैलाचा दगड ठरेल. श्री गिजुभाई बधेका, पद्मभूषण श्रीमती ताराबाई मोडक आणि पद्मश्री श्रीमती अनुताई वाघ यांनी बालशिक्षणाचे रोप भारतभूमीत लावले. एकात्मिक बालविकास योजना मधील अंगणवाड्यात अंगणवाडी सेविकांनी केलेल्या संगोपनामुळे इ. स. १९७५ पासून बालशिक्षणाचे हे शेप बहरत राहिले. या निर्णयामुळे ते अधिक उमेदीने बहरून त्याचा वृक्ष होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नवीन धोरणातील या शैक्षणिक रचनेमध्ये तीन ते सहा वयोगटाचा समावेश झाल्यामुळे राज्यात बालशिक्षणाचे पद्धतशीर रीतीने सार्वत्रिकीकरण करण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. ३ ते ६ वयोगटातील बालकांसाठी अभ्यासक्रम तयार करण्याची संधी महाराष्ट्र राज्याने देशात सर्वप्रथम घेतली. इ. स. २०१५ मध्ये ३ ते ५ या वयोगटासाठी 'आकार' हा बालशिक्षणक्रम तयार केला होता. हा आकार बालशिक्षणक्रम वापरून राज्यातील एकात्मिक बालविकास योजनेखालील जवळपास एक लाख, दहा हजार अंगणवाड्यांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६ पासून शिक्षण दिले जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे या 'आकार' बालशिक्षणक्रमाला अधिक समृद्ध रूप देण्याची संधी राज्याला मिळाली आहे. नवीन बालशिक्षणक्रम, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - २०२२ यांच्याशी सुसंगत करण्यासाठी पायाभूत स्तरासाठीचा राज्य अभ्यासक्रम आराखडा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेने विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या मदतीने तयार केला आहे.यात विज्ञानमय कोश ,प्राणायाम कोश,आनंदमय कोश,मनोमय कोश,अन्नमय कोश, पायाभूत स्तरावरील अभ्यासक्रम आराखड्यातील शिक्षण विचारांचा लाभ राज्यातील बालकांना लवकर मिळणे गरजेचे आहे. पायाभूत अभ्यासक्रम आराखड्यात राज्याने पाहिलेले बालविकासाचे एक भव्य स्वप्न आता बालशिक्षण मध्ये साकार करायचे आहे. हे काम बालशिक्षणच्या भविष्याची दोरी हाती असणाऱ्या अंगणवाडी सेविकाच 'शस्वीपणे पूर्ण करणार आहेत; म्हणून परिषदेमार्फत अंगणवाडी सेविकांसाठी पायाभूत स्तरावरील शिक्षण विचारांची तोंड ओळख करून देण्यासाठी आनंदी बालशिक्षण या दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देशमुख यांनी दिली. शिरूरच्या बालविकास प्रकल्प अधिकारी वैशाली सटाले-झेंडे यांच्या मार्गदर्शनानुसार आज कवठे बीटमध्ये येथील ग्रामपंचायत सभागृहात आयोजित प्रशिक्षण मध्ये राज्य अभ्यासक्रम आराखडाः पायाभूत स्तर २०२४ सोबतच खेळणी आधारित अध्यापनशास्त्र व जादू याविषयी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बीट मधील सर्व अंगणवाडी सेविकांनी हे प्रशिक्षण पूर्ण करून आपल्या अंगणवाडीतील बालकांचे शिक्षण आनंददायी करावे असे आवाहन ही पल्लवी देशमुख यांनी केले आहे.

## ॲसेंड स्कूलमध्ये शाहू महाराजांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाकडून २६ जून हा दिवस सामाजिक न्याय दिवस म्हणुन साजरा केला जात असतो.हा दिवस सर्वत्र साजरा होत असताना छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन करण्यात आले.निरा पिंपरे ता.पुरंदर येथील ॲसेंड इंटरनॅशनल स्कूल कडून छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करीत त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले.संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे,सचिव नीता खोमणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका सुषमा भुंजे यांच्या कडून विशेष नियोजन करण्यात आले.या प्रसंगी सुरेखा पाटोळे, रुपाली शितोळे, पुष्पा शिंदे,अल्पना फरांदे,दीपिका निगडे,माधुरी ठोंबरे, मनिषा धायगुडे,जास्मिन बागवान,श्वेता शिळीमकर आदी शिक्षिका तसेच कर्मचारी वर्ग पुष्पा गायकवाड आणि रुपाली गायकवाड आणि विद्यार्थी उपस्थित होते. छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याबद्दल विशेष विचार मंथन करण्यात आले.त्यांचे विचार आणि त्यांच्या कार्याबद्दल माहिती सांगण्यात आली. छत्रपती शाहू महाराजांनी शोषित,पीडित,वंचित घटकातील लोकांसाठी काम करत असताना त्यांना मुख्य प्रवाहात आणले.महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक चळवळी च्या कार्यास ही पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना उच्च शिक्षणासाठी शाहू महाराजांनी शिष्यवृत्ती दिली.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मूकनायक हे पाक्षिक अडचणीत असताना शाहू महाराजांनी त्यांना आर्थिक मदत केली.लोकांच्या मदतीला धावुन जाणारा राजा म्हणून छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे पाहिले जाते.त्यांनी हिंदू,मुस्लिम,जैन आदी धर्माची बोर्डिंग निर्माण केली.पालकांनी आपल्या मुला बाळांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे.म्हणून शाहू महाराज आपल्या राज्यात शिक्षणाची सक्ती करत असत. जे पालक मुलांना शाळेत पाठविणार नाहीत. त्यांना शिक्षेचे फर्मान ही शाहू महाराजांनी काढले होते. प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे असल्याची भूमिका शाहू महाराज मांडत होते. व्यवसाय करण्यासाठी अनेकांना त्यांनी मदत केली. छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांनी रयतेच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेत राज्यकारभार चालविला.न्याय देण्याची भूमिका त्यांच्या प्रत्येक निर्णयात होती.त्यामुळे त्यांच्या जयंती दिनी सामाजिक न्याय दिन साजरा करणे हे खरंच शाहू महाराज यांना अभिवादन करणारा निर्णय आहे. याबद्दल शासकीय निर्णयाचे कौतूकच आहे.असे विचार विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले.



## ओवैसींची खासदारकी रद्द करा : नवनीत राणा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर 18 व्या लोकसभेसाठी नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी पार पडला. त्यामध्ये, महाराष्ट्रातील बहुतांश खासदारांनी मराठीतून शपथ घेतली. तर, काहींनी हिंदीत शपथ घेतली. मात्र, अहमदनगरचे खासदार निलेश लंके यांनी इंग्रजीत घेतलेली शपथ सर्वात चर्चेत आणि लक्षवेधी ठरली. लंकेच्या शपथविधीचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला होता. तर, दुसरीकडे एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनीही घेतलेल्या शपथविधीचाही व्हिडिओ व्हायरल झाला होता. आता, खासदार ओवैसींच्या या शपथविधीच्या व्हिडिओवरुन त्यांची खासदारकी रद्द करण्याची मागणी केली जात आहे. माजी खासदार नवनीत राणा यांनी राष्ट्रपतींना पत्र लिहून ही मागणी केली आहे.

# निसर्गाचे औषधालय: पावसाळ्यात मानवाच्या आरोग्यासाठी लाभदायक ठरणाऱ्या वनस्पती

आधुनिक केसरी



डॉ. उदयभान ए. यादव

***पावसाचे पाणी पृथ्वीला नवजीवन देत असताना, उन्हाळ्याच्या उष्णतेपासून दिलासा मिळतो आणि ते आपल्यासाठी असे काही वनस्पतींवर लक्ष केंद्रित करण्याची योग्य संधी देते ज्या पावसाळ्यात आपले आरोग्य वाढवू शकतात. काही वनस्पती पावसाळ्याच्या ओलसर परिस्थितीत चांगले वाढतात आणि असाधारण आरोग्य फायदे देखील देतात. येथे आम्ही पावसाळ्याच्या महिन्यांत लागवड करण्यासाठी आणि त्यांच्या औषधी गुणधर्मांसाठी काही सर्वोत्तम वनस्पतींचे विश्लेषण करतो.***











**तुळस :** तुळस किंवा होली बेसिल, पारंपरिक औषधांमध्ये त्याच्या विस्तृत आरोग्य फायद्यांसाठी प्रसिद्ध आहे. पावसाळ्यात श्वसनाचे आजार आणि संसर्ग सामान्य असतात, तुळस विशेषतः फायदेशीर ठरू शकते. त्याच्या पानांमध्ये शक्तिशाली जीवाणुरोधी, विषाणूरोधी आणि दाहक विरोधी गुणधर्म असतात. तुळशीचा चहा प्यायल्याने प्रतिकारशक्ती वाढते, श्वसनाचे आजार कमी होतात आणि तणाव दूर होतो.

**कोरफड :** कोरफड ही एक बहुगुणी वनस्पती आहे जी तिच्या शीतल आणि उपचारात्मक गुणधर्मांसाठी ओळखली जाते. पावसाळ्यात ही वनस्पती चांगली वाढते आणि तिची जेलने भरलेली पाने त्वचेच्या जळजळ, भाजलेल्या जखमा आणि कापलेल्या जखमा उपचारण्यासाठी उत्कृष्ट असतात. कोरफडीचा रस पचन आणि विषारी पदार्थांच्या शरीरातून बाहेर काढण्यास मदत करतो, ज्यामुळे पावसाळ्यात आपल्या आहारात एक मूल्यवान घटक ठरतो.

**पुदीना :** पुदीना ही एक ताजगी देणारी वनस्पती आहे जी ओलसर परिस्थितीत चांगली वाढते. पचनाच्या फायद्यांसाठी ती प्रसिद्ध आहे, ज्यामुळे पावसाळ्यातील पोटाच्या समस्या दूर करण्यासाठी हा एक उत्तम उपाय आहे. पुदिन्याचा चहा अपचन, फुगवटा आणि मळमळ दूर करतो. पुदिन्यामधील मेंथॉल डोकेदुखी आणि सर्दीपासून आराम देतो.

**हळद :** ज्यामध्ये सक्रिय घटक म्हणून कर्क्युमिन असतो, ती एक शक्तिशाली दाहक विरोधी आणि अँटिऑक्सिडंट आहे. आपल्या बागेत हळद वाढविल्याने तुम्हाला ताजी, सेंद्रिय मुळे मिळू शकतात जी स्वयंपाक आणि घरगुती उपायांसाठी वापरता येतात. हळदीचे दूध, किंवा "गोल्डन मिल्क," हे एक लोकप्रिय पावसाळी पेय आहे जे प्रतिकारशक्ती वाढवते आणि संसर्गांशी लढायला मदत करते.

**आले :** आले ही एक मजबूत वनस्पती आहे जी ओलसर, दमट परिस्थितीत चांगली वाढते. पावसाळ्यात होणारी सर्दी, खोकला आणि घशाचा त्रास यावर ते अत्यंत प्रभावी आहे. आल्याचा चहा, ज्यासाठी आल्याच्या तुकड्यांना पाण्यात उकळले जाते, हे त्वरित आराम देऊ शकते. याशिवाय, आल्याच्या दाहक विरोधी गुणधर्मांमुळे सांधे आणि स्नायूंच्या वेदना कमी होतात.

**नीम :** नीमच्या शक्तिशाली जीवाणुरोधी आणि बुरशीरोधी गुणधर्मांमुळे ती ओळखली जाते. पावसाळ्यात, नीम त्वचेच्या संसर्ग आणि इतर पावसाळी आजार टाळण्यास मदत करू शकते. नीम पाण्याने आंघोळ केल्यास त्वचेच्या समस्यांपासून मुक्तता मिळते, तर नीम तेल जखमा आणि किड्याच्या चाव्यांवर लावल्यास त्वरीत उपचार होतात.

**लेमनग्रास :** लेमनग्रास ही सुगंधी वनस्पती आहे जी पावसाळ्यात चांगली वाढते. ती अँटिऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे आणि जीवाणुरोधी आणि बुरशीरोधी गुणधर्म आहेत. लेमनग्रास चहा एक ताजेतवाने पेय आहे जे शरीराचे विषारी पदार्थ बाहेर काढण्यास, पचन समस्यांचे निवारण करण्यास आणि प्रतिकारशक्ती वाढविण्यास मदत करते. तिचा आनंददायक सुगंध नैसर्गिक मच्छर प्रतिबंधक म्हणून कार्य करतो.

**आरोग्य आणि कल्याण टिप्स :** या वनस्पती पावसाळ्याच्या काळात आपल्या दैनंदिन जीवनात समाविष्ट केल्याने तुमच्या आरोग्य आणि कल्याणात लक्षणीय वाढ होऊ शकते. या वनस्पतींचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी येथे काही टिप्स दिल्या आहेतः

**हर्बल चहा :** तुळस, पुदीना, आले किंवा लेमनग्रास वापरून चहा तयार करा आणि त्यांचे आरोग्य फायदे उपभोगा.

टॉपिकल अनुप्रयोगः त्वचेच्या समस्यांवर आणि किरकोळ जखमांवर उपचार करण्यासाठी कोरफड जेल आणि नीम तेल वापरा. **स्वयंपाकात वापरः** प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि संसर्गांशी लढण्यासाठी तुमच्या स्वयंपाकात हळद आणि आले घाला. या लाभदायक वनस्पतींचा स्वीकार करून, तुम्ही पावसाळ्यात निरोगी आणि सक्षम राहण्यासाठी निसर्गाची औषधालय वापरू शकता. या वनस्पती केवळ शारीरिक आरोग्यासाठीच नव्हे तर मानसिक कल्याणासाठी देखील योगदान देतात, पावसाळ्याच्या महिन्यांत कल्याणासाठी एक सर्वसमावेशक दृष्टिकोन देतात.

**(लेखक हे प्रभारी प्रमुख, वनस्पतिशास्त्र विभाग ठाकूर श्यामनारायण डिग्री कॉलेज आहेत.)**

**ईमेल आयडी: SURYODAY29@GMAIL.COM**



## राजुर येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** सामाजिक लोकशाहीचे पुरस्कर्ते,गोरगरीब, दीनदुबळ्या समाजाचे आधारस्तंभ, आरक्षणाचे जनक,व आपल्या राज्यात क्रीडा व कला क्षेत्राला राजाश्रय देणारे लोकराजे राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांची जयंती राजूर येथील जे.ई.एस. विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शाहू महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

याप्रसंगी शाळेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका आशाताई पुंगळे, सुदर्शन रामटेके, दत्तू ठोंबरे विष्णू मिसाळ, दिपक डवले, मोरे, प्रमोद जाधव,कुलदीप गिरी, सिध्दार्थ रगडे,माळी सर, वरद पुंगळे, नवले सर,किशोर पवार, श्रीमती राऊत मॅडम, श्रीमती गिरी मॅडम, श्रीमती थोटे मॅडम, श्रीमती शेजुळ मॅडम, श्रीमती गोरे मॅडम, श्रीमती गायके मॅडम, श्रीमती माने मॅडम, श्रीमती पिंपळे मॅडम, दळवी मॅडम, उगले मॅडम, शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी कैलास बावस्कर, गटकाळ, बाबासाहेब जाधव ईत्यादींची उपस्थिती होती.

## संत ज्ञानेश्वर बालकाश्रमात वृक्षपूजन, वृक्षारोपण

### ज्येष्ठ नागरिक महासंघाचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने संत ज्ञानेश्वर बालकाश्रम कळंब च्या प्रांगणात पत्रकारांच्या हस्ते वृक्ष पूजन व वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष ह. भ .प. महादेव महाराज अडसुळ हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नागरिक महासंघाचे मराठवाडा प्रदेश सचिव डि.के. कुलकर्णी, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, सतीश टोणगे यांची उपस्थिती होती. उपस्थित पत्रकार दिलीप गंभीरे, सतीश बप्पा टोणगे, संभाजी गिड्डे ,सतीश मातने ,माधवसिंग राजपूत, प्रदीप यादव ,संदीप कोकाटे यांच्या हस्ते कदंब वृक्षाचे रोपन करण्यात आले याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात वृक्षरोपण काळाची गरज असून वृक्षारोपण चळवळ गतिमान व्हावी याचे महत्त्व नागरिकांना कळले पाहिजे यासाठी पत्रकार आपल्या लेखणीच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसार करीत असतात यासाठी आज ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने अंगारकी चतुर्थी परवा निमित्त पोराणिक व बहुपयोगी औषधी अशा आपल्याकडील दुर्मिळ कदंब वृक्षाचे रोपण व पूजन कार्यक्रम पत्रकारांच्या हस्ते घेण्यात आला असल्याचे सांगितले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश शिंदे यांनी सूत्रसंचालन प्राचार्य महादेव गपाट यांनी तर आभार प्रदर्शन बंडू आबा ताटे यांनी केले.





## विद्याविकास विद्यालयात गुणवंतांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** शिराढोण कळंब तालुक्यातील निपाणी येथे दिनांक 26 जून 2024 रोजी विद्या विकास विद्यालय निपाणी. इयत्ता दहावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संतोषजी राऊत (सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास मंत्रालय मुंबई) तसेच श्री कल्याण नेहरकर (पोलीस निरीक्षक शिराढोण) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच इयत्ता दहावी परीक्षेतून प्रथम क्रमांक कु. पल्लवी लोमटे दुतीय क्रमांक कु. पवार कृष्णा तृतीय क्रमांक कु. अक्षरा साळुंखे यांना सन्मानचिन्ह तसेच रोख स्वरूपात बक्षीस देऊन सन्मानित केले. NMMS परीक्षेतील शिष्यवृत्तीधारक कु.प्रणव गुंड व कु.अंकित गिरी यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी.श्री हरिश्चंद्र निपाणीकर (अध्यक्ष विद्या विकास विद्यालय निपाणी)बाबासाहेब पाटील (सचिव विद्या विकास विद्यालय निपाणी) व राजशेखर पाटील,श्रीमंत निपाणीकर, नवनाथ निपाणीकर, राहुल पाटील, संजय चौधरी (शिक्षक) व विद्यार्थ्यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने इत्यादी उपस्थित होते.

## पहूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लेलेनगरमध्ये मोफत वह्यांचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक विद्यामंदिर लेले नगर शाळेत इयत्ता पहिली ते चौथीच्या ११८ विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी ४ वह्या या प्रमाणे केविन लोढा व उज्वल सिसोदिया यांच्या हस्ते वाटप करण्यात आल्या. पहुर परिसरात जिल्हा परिषद शाळेच्या गरजू विद्यार्थ्यांना आपल्याकडून काहीतरी मदत करता यावी या उदात्त हेतूने केविन लोढा, प्रशांत बेदमुथा, महावीर छाजेड, उज्ज्वल सिसोदिया, शितल चोरडिया, योगेश बेदमुथा, दिनेश बेदमुथा, विनय सांखला व पहूर येथील जैन समाज बांधवांच्या मार्फत वह्या वाटप करण्यात आल्या. पहूर येथील जैन समाजातील नवतरुणांनी गावात आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल पालकांनी कौतूक केले. कार्यक्रमचे सूत्रसंचालन महेश मोरे यांनी तर आभार मुख्याध्यापक चंद्रकांत साळुंखे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेश राठोड सर व किरणबाला पिंपळे यांनी सहकार्य केले.





# त्रासदायक आवाज करणाऱ्या वाहनांवर वाहतूक शाखेची धडक कारवाई

## ३५ दुचाकी वाहनांवर कारवाई करून दंड

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील बुलेट वाहन धारक हे वाहनाच्या वनावट मध्ये फेरफार करुन वाहनास कर्णकर्कश आवाज करणारे सायलेन्सर वसवितात त्यामुळे शहरातील ध्वनी प्रदूषणापासून नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. मोठ्याने आवाज करणारे सायलेन्सर बसविल्यामुळे विशेपता बालक व वयोवृध्द यांना त्रास होवु नये म्हणून दिनांक २६ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी १३.०० वाजे पावेतो शहरातील जयहिंद ज्युनिअर कॉलेज, दत्त मंदिर चौक, महाजन हायस्कूल, संतोषी माता चौक, वारापत्थर, मामलेदार कचेरी चौक या वरदळीच्या ठिकाणी शहर वाहतुक शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे सह विशेष मोहिम राबवून बुलेट वाहनांच्या सायलेन्सरची तपासणी केली त्यात एकुण ३५ इतक्या वाहन धारकांनी त्यांचे वाहनास कर्नकर्कश्य आवाज करणारे सायलेन्सर बसविलेले आढळुन आले त्यांचेवर मोटर वाहन कायदा कलम १९८ प्रमाणे कारवाई करण्यात आलो असुन त्यात सदर मोटर वाहन कायदया अंर्तगत ३५ इतक्या केसेस करण्यात आल्या असुन रुपये ३५०००/- दंड करण्यात आला आहे. सदरची कारवाई हि मा. पोलीस अधीक्षक सो श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक सो किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन यापुढे देखील अशाच प्रकारची कारवाई सुरुच राहणारआहे. तरी धुळे शहरातील बुलेट वाहन धारक यांनी वाहतुक नियमांचे पालन कराये आपल्या बुलेट बाहनातील सायलेन्सर मध्ये कोणताही अनावश्यक बदल करु नये असे आवाहन भुषण कोते प्रभारी अधिकारी शहर वाहतुक शाखा धुळे यांनी केले आहे.

## अंगारकी चतुर्थीनिमित्त दर्शनासाठी गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** शेलगाव गिरिजा नदी गिरीराज गणपती मंदिरातगि अंगारकी चतुर्थी निमित्त दर्शनासाठी भाविकांनी (दि२५) गर्दी केली होती. बाजार सावंगी -फुलंब्री किनगाव फाटा मुख्य रस्ता गिरिजा नदी काठी गिरीराज गणपती मंदिर असुन मंदिरात दर्शनासाठी नेहमी भाविकांची गर्दी असते. परंतु दि.२५रोजी अंगारकी चतुर्थी बघता मोठ्या संख्येने भाविक मंदिरास्थळी पोहोचले होते.दर्शना साठी पुजा करता विविध दुकाना थाटल्या होत्या.तर मंदिर परिसरातील अनेक गावातील भाविक अंगारकी चतुर्थी निमित्त मोठी गर्दी करुन होते. त्यात बाजार सावंगी फुलंब्री किनगाव फाटा हे मुख्य रस्ता असल्याने ये जा करणारे वाहन थांबुण भाविक नागरिक दर्शन घेताना दिसले त्यामुळे पुन्हा अधिक गर्दीत भर पडली. गिरीराज मंदिर बांधण्यात आले तेव्हापासून भाविक भक्तांची गर्दी वाढतच चालली असल्याचे चित्र आहे.

## शास्त्रज्ञ दीपक कच्छवे यांचे मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथे आज दिनांक 26/6/2024 रोजी मौजे सावलदबारा येथे ग्रामपंचायत कार्यालयात कृषी संजीवनी पंधरवाडा निमित्त सोयाबीन,तूर व इतर कडधान्य लागवड व तंत्रज्ञान या दिनानिमित्त तूर,मूग ,उडीद या पिकाची परिपूर्ण माहिती माननीय डॉक्टर दीपक कच्छवे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले.तुम्हाला कोणत्याही पिकाविषयी अडचण आली तर मला कॉल मी तुम्हाला मागदर्शन करेल असे पण त्यांनी बोलताना सांगितले.यावेळी तालुका कृषी अधिकारी मदन शिसोदीया.मंडळ कृषी अधिकारी रमेश गुंडीले. कृषी पर्यवेक्षक अतुल पाटील, कृषी सहायक सुरळकर व सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो लुखमान,प्रा योगेश चोपडे,ग्रामपंचायत मोहन सुरडकर, भागवत जाधव सरपंच टिटवी, शेतकरी प्रदिप तुकाराम काळे, मो.आशपाक मो.ईशा, योगेश गायकवाड,सोनू ठाकूर, उपसंपादक गोकुळसिंग राजपूत, पत्रकार दिलीप देशमुख,पत्रकार रहीम खान पठाण, प्रगतीशील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते



# नागरिकांच्या आग्रहास्तव गंगापूर-खुलताबाद विधानसभा लढणारच : सतीश शुक्ला

## उद्योग व रोजगारांची संधी उपलब्ध करणार

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** गंगापूर खुलताबाद आगामी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळो अथवा ना मिळो, मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहे,' असा निर्धार खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथील प्रसिद्ध हरियाली फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक सतीश शुक्ला यांनी केला आहे. 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची उमेदवारी मिळो अथवा न मिळो; मात्र अपक्ष म्हणून गंगापूर खुलताबाद मतदार संघातून निवडणूक लढवणारच आहे. आता पासूनच व्यूहरचना सुरू केली आहे. यासाठी सर्वांनी एकत्र येऊन. खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथील भूमिपुत्राचे साथ द्यावी,' असे आवाहन ही त्यांनी केले. शेतकरी, कामगार, विद्यार्थी यांच्या प्रश्नांची जाण असून, गंगापूर खुलताबाद तालुक्यातील प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. शुक्ला यांनी निवडणुकीत उतरण्याची तयारी दर्शवल्याने गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघातील सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये चर्चेला उधान आले आहे.

# आता शिक्षकांच्या वरिष्ठ निवड श्रेणीसाठी विशेष शिबिर : अनिल शिवणकर

## भाजप शिक्षक आघाडीची मागणी मान्य

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** भाजप शिक्षक आघाडी नागपूर ग्रामीण व शहराची सहविचार सभा अनिल शिवणकर ,अध्यक्ष नागपूर विभाग, भाजप शिक्षक आघाडी यांच्या नेतृत्वात मा. रोहिणी कुंभार, शिक्षणाधिकारी (माध्य)यांच्या दालनात संपन्न झाली. सभेमध्ये शिक्षकांचे अनेक प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यात आले. त्यात लोकसभेच्या निवडणुकीच्या आचारसंहितेच्या आधीपासून प्रलंबित असलेले वरिष्ठ निवड श्रेणीचे सर्व प्रस्ताव ९ जुलैला विशेष कॅम्पद्वारे निकाली काढणे,वरिष्ठ निवड श्रेणीचे प्रस्ताव मुद्दाम व जाणीवपूर्वक न पाठवणाऱ्या मुख्याध्यापकांवर कार्यवाही करणे, सत्र 2023 - 24 च्या संच मान्यतेनंतर समायोजन करणे , एनपीएस चे प्रस्ताव मागवणे मान्य करणे, जीपीएफ च्या स्लिप चा गोंधळ दूर करणे, अंशतः अनुदानित 20% 40% 60 80% शाळेतील शिक्षकांना नियमानुसार अतिरिक्त ठरविण्याचे निर्देश संस्थेला देणे, शिक्षकांची सर्व थकीत देयक मंजूर करणे, वैद्यकीय देयक प्रस्ताव, रजा रोखीकरणाचे प्रस्ताव तात्काळ निकाली काढणे व अनेक शिक्षकांचे वैयक्तिक विषय निकाली काढण्यात आले.सभेस अनिल शिवणकर, डॉ. उल्हास फडके,योगेश बन,सुधीर अनवाणे ,नरेश कामडे ,हरीश केवटे ,प्रदीप बिबटे,ओंकार श्रीखंडे,विशाल चव्हाण,प्रशांत राऊत, कपिल उमाळे, गणेश धोटे,संदीप उरकुडे ,रविंद्र बावनकुळे,मनीष भटेरो,संदीप पेटकर,होमसिंग पवार, राजू धानोरे, पवनकुमार चव्हाण, राहुल वाणी, चेतन श्रीखंडे, संजय तिडके मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.




# तर साखर कारखानदारांना उसाच्या बुडक्याने ठोकून काढू; राजू शेट्टी यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** उसाचा गतवर्षीचा थकीत हप्ता शेतकऱ्यांना तातडीने द्यावा. साखर कारखानदारांनी शेतकऱ्यांचे हे पैसे बुडवायचे मनात सुध्दा आणले तर त्याच बुडक्याने तुम्हाला ठोकून काढू, असा इशारा राजू शेट्टी यांनी बुधवारी येथे दिला. कैफियत पदयात्रा सांगता कार्यक्रमात येथे सायंकाळी ते बोलत होते. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ठरल्याप्रमाणे १०० व ५० रुपयाचा दुसरा हप्ता देण्याची राज्य सरकार व साखर कारखानदार यांना सद्बुद्धी मिळावी तसेच शक्तिपीठ महामार्ग रद्द व्हावे यासाठी शाहू महाराजांचे जनकस्थळ कागल ते समाधीस्थळ कोल्हापूरपर्यंत छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन करून कैफियत पदयात्रा काढण्यात आली. कोल्हापुरात बोलताना राजू शेट्टी म्हणाले, गतवर्षीचा थकीत हप्ता शेतकर्यांना तातडीने द्यावा. साखर कारखानदारांनी शेतकर्यांचे पैसे बुडवायचे मनात सुध्दा आणले तर त्याच बुडक्याने तुम्हाला ठोकून काढू. आमच्या सहनशिलतेचा संयम सुटलेला आहे. स्वाभिमानीच्यावतीने गेल्यावर्षी नोव्हेंबरमध्ये ऊस उत्पादक प्रश्नावर राष्ट्रीय महामार्ग रोको आंदोलन केले होते. उसाला तीन हजार रुपयांपेक्षा अधिक दर दिलेल्या शेतकऱ्यांना १०० रुपये प्रति टन मिळावेत तसेच तीन हजारापेक्षा कमी पैसे दिलेल्याना ५० रुपये द्यावेत ही मागणी होती. जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी तशी हमी जिल्हाधिकाऱ्यांना दिली होती.

# संकष्ट चतुर्थीनिमित्त मनोज पवार यांच्याकडून फराळाचे वाटप



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील देवपुळ येथे अंगारक संकष्ट चतुर्थी निमित्त सुप्रसिद्ध असलेले देवस्थान श्री क्षेत्र नवसाचा राजा गणपती मंदीर देवपुळ येथे उद्योजक तथा समाजसेवक मनोज पुष्पाबाई पवार आणि त्यांच्या सुविद्य पत्नी उद्योजिका उर्मिलाताई मनोज पवार यांच्या हस्ते आरती करण्यात आली व यावेळी पंचक्रोशीतील आलेल्या सर्व गणेश भक्तांना उद्योजक मनोज पवार यांच्या हस्ते फराळ वाटप करण्यात आले या प्रसंगी उपस्थित तंटामुक्ती अध्यक्ष कौतिक विठ्ठल घुगे, माजी सरपंच पुंडलिक घुगे, रघुनाथ घुगे, तुळशीराम घुगे, रामराव घुगे, कन्नड तालुका खरेदी विक्री तालुका संघाचे संचालक भगवान काजे, मेहेगाव उपसरपंच शरद घुगे, केतन त्रिभुवन, राजू भोसले, पवन ठाकूर, रुपेश भारुका, संतोष पवार, सोमिनाथ दाभाडे, दर्शन देशमुख यांची उपस्थित होती.

# जिंतूरच्या वीज वितरण कंपनीच्या ट्रांसफार्मर, पोलची दयनीय अवस्था

## माजी नगरसेवकाची तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**बी.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** विज वितरण कंपनीची दैनीय अवस्था झाली असून शहरातील ट्रान्सफॉर्मर, पोल धोकादायक अवस्थेत असल्यामुळे कोणत्याही क्षणी नागरिकांच्या तसेच जनावरांच्या जीवितस धोका पोहोचू शकत असल्याची तक्रार एडवोकेट गोपाळ रोकडे नगरसेवक यांनी केली आहे.

याबाबत अधिक ची माहिती अशी की, जिंतूर शहरातील अनेक ठिकाणचे ट्रान्सफॉर्मर व विजेचे पोल अत्यंत धोकादायक परिस्थितीत असल्याने वीज वितरण अधिकाऱ्यांनी याकडे तात्काळ लक्ष देऊन पुढील होणारा धोका टाळावा अशी निवेदनात म्हटले आहे. त्याचबरोबर जिंतूर शहरातील प्रभाग क्रमांक नऊ मधील सटवाई मंदिराकडे जाणाऱ्या उलट्या नदी लगतच्या ट्रांसफार्मर अतिशय धोकादायक परिस्थितीत असून प्रभाग 6 व प्रभाग 9 मधील पोल अतिशय धोकादायक असून कधीही त्यापासून जीवितास धोका संभवतो त्यामुळे याकडे त्वरित लक्ष देण्याची गरज असल्याचे अधीक्षक अभियंता यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, जिंतूर शहरात या अगोदर विजेच्या तार



लागून ईदगा परिसरात एका तरुणांचा मृत्यू झाला होता., त्याचबरोबर आठवडी बाजार परिसरात मोडकळीस आलेल्या विजेच्या खांबामुळे एका लहान बालकास आपला जीव गमावा लागला होता., तर येलदरी रोड भागात अशाच एका दुर्घटनेत एका तरुणाला जीव गमावा लागला होता. वीज वितरण कंपनीचे अधिकाऱ्यांनी सदरील बाबींचे पंचनामे सुद्धा केल्याची निवेदनात म्हटले आहे. याबाबत आपणास वेळोवेळी अर्ज व तोंडी सांगून सुद्धा वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी यावर कोणतीही गांभीर्याने दखल घेतली नसल्याची निवेदनात म्हटले आहे. सदरील निवेदन एडवोकेट गोपाळ रोकडे माजी नगरसेवक तथा गटनेता नगरपरिषद जिंतूर यांनी वीज वितरण च्या अधीक्षक अभियंतांना दिल्याची म्हटले आहे.

# बाळापूर येथे बोगस डॉक्टरवर कारवाई कधी

## डॉक्टरकडे कुठल्याही प्रकारची डिग्री नाही

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सिल्लोड :** तालुक्यात बोगस डॉक्टरांची संख्या अधिक असल्यामुळे बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खळबळ उडाली आहे. यामुळे तालुक्यातील गाव पाड्यांत दुकाने मांडून बसलेल्या बोगस डॉ क्टरांचे धाबे दणाणले असून बहुतांश बोगस डॉक्टरांनी आपली दुकाने बंद करून भूमिगत झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. आदिवासी भागात गाव, पाड्यांमध्ये वैद्यकीय सेवेचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. त्याचा फायदा घेऊन वेगवेगळ्या राज्यातील बोगस डॉक्टरांनी गाव, पाड्यांमध्ये वैद्यकीय व्यवसाय सुरू केले आहेत. अनेक वर्षे व्यवसाय करून त्यांनी मोठी माया देखील गोळा केली आहे. या बोगस डॉ क्टरांवर कारवाई करण्याबाबत नागरिकांनी अनेकदा तक्रारी केल्या आहेत.मात्र, प्रशासनाकडून कारवाईबाबत चालढकल करण्यात येत असल्याचे चित्र होते. अखेर, सिल्लोड तालुक्यातील बाळापूर येथे व्यक्ती स्वतःला



डॉक्टर म्हणून घेत असून बाळापुर येथे गेल्या वीस वर्षापासून हा डॉक्टरकीचा गोरख धंदा खेळत आहे. ग्रामीण भागातील लोक त्यांच्याकडे आजारी असताना चेक करायला गेले असता. पहिले तर आपले महाशय दोन इंजेक्शन देऊन टाकतात. आणि सांगतात नाही बरे वाटले तर तीन दिवसांनी परत या. बोगस डॉक्टर असल्यामुळे लोकांना काही गुण येईना यातून डॉक्टरची कमाई मात्र जोरात व गरीब शेतकरी कष्टकरी कोमात. एखाद्याला जास्त ताप वगैरे आला तर त्यांच्याकडून नाही बरा झाला तर तुम्ही आता लगेच सिल्लोडला निघा. असे सांगून तो त्यांच्या अंगावरती येणारे संकट टाळत आला आहे.

# साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्या शिबिरामुळे दोनशे पन्नास रुग्णांना मिळाली नेत्रदृष्टी

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** येथील श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट शिर्डी व





आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवी मुंबई यांच्या माध्यमातून तीन महिन्यात घेण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजनातुन अध्यक्ष अरुण गायकवाड सौ संगिता गायकवाड व संचालक साईराज गायकवाड या पुढाकाराने पार पडलेल्या शिबिरात दोन हजार सातशे रुग्णाची तपासणी करून दोनशे रुग्णाच्या वरती शस्त्रक्रिया करण्यात आल्याने दोनशे पन्नास रुग्णाना नवी दृष्टी मिळाल्याची माहिती साईराज गायकवाड यांनी दिली

साईबाबाचा रुग्णसेवेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रेरणा घेत समाजातील गोरगरीब कष्टकरी शेतकरी महिला मजुर कामगार व आर्थिक दुर्बल घटकातील दृष्टी दोष असलेल्या रुग्णानाच्या जीवनात आनंद निर्माण कसा करता येईल या भावनेतून डोळ्यासमोर हे अभियान येताच प्रत्येक महिन्यात अशा शिबिरे घेण्यात आली तीन महिन्यात दोन हजार रुग्णानी तपासणी करुन घेतली त्यातील दोनशे रुग्णाना थेट मुंबई येथील हॉस्पिटल मध्ये

**गायकवाड कुटुंब ठरले रुग्णाच्या गळ्यातील ताईत :** समाजसेवेची आवड सामाजिक दायित्व व साईबाबाच्या रुग्णसेवेची प्रेरणा यामुळे शिर्डी येथील साईभक्त असलेल्या गायकवाड कुंटुबामुळे अनेकांना नेत्र दृष्टी मिळाल्याने हे कुटुंब रुग्णाच्या गळ्यातील ताईत बनले आहे .

नेऊन त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आल्या कारण खाजगी रुग्णालयात या अशा प्रकारच्या शस्त्रक्रियेसाठी मोठा आर्थिक खर्च येत असल्याने असे रुग्ण जरी दृष्टी कमी झाली अस्पष्ट दिसत असले तरी त्याकडे फारसे गंभीरपणे बघत नाही व घरातून देखील गंभीरपणे बघितले जात नाही याचे शल्य व विदारक वास्तव्य समाजात वावरताना पुढे आले त्यामुळे सामाजिक दायित्व डोळ्यासमोर ठेवून हे अभियान सुरू केले त्यास मिळणारा प्रतिसाद मोठा असल्याने या कामातून मोठे समाधान मिळत असल्याचे साईराज गायकवाड यांनी सांगितले या शिबिरात नगर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील रुग्णानी मोठा प्रतिसाद बघितल्यावर हे अभियान मोठ्या प्रमाणावर यशस्वी होत असल्याचे पुढे आले असून नगर जिल्ह्यात अशा प्रकारे डोळ्यासाठी मोफत तपासणी व शस्त्रक्रिया करणारे श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिदे ट्रस्ट हि एकमेव सेवाभावी ट्रस्ट ठरली आहे वडील अरुण गायकवाड व आई संगिता गायकवाड यांची प्रेरणा व खंबीर अशी साथ शंकरा आय हॉस्पिटल मधील तज्ञ डॉक्टर यामुळे हे यश मिळाले आहे असे गायकवाड यांनी सांगितले.

# चंद्रपुरात लवकरच ‘ई-बस’ धावणार!

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वायू व हवा प्रदूषणाच्या तीव्र समस्येचा सामना करणाऱ्या चंद्रपूर शहरात महापालिका लवकरच ‘पीएम ई-बस सेवा’ सुरू करणार आहे. केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाकडे महापालिकेने ५० ‘ई-बस’चा प्रस्ताव पाठवला आहे. शहर आणि परिसरातील २५ किलोमीटरपर्यंत ही बस लोकांना सेवा देईल.

वीज केंद्र, कोळसा खाणी, पोलाद उद्योगांमुळे गेल्या कित्येक वर्षांपासून शहरवासीयांना वायू व हवा प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. त्यात वाहन प्रदूषणाची भर पडली आहे. या पार्श्वभूमीवर शहरात प्रदूषणविरहित ‘ई-बस’ चालवण्याचा प्रस्ताव महापालिकेने केंद्र सरकारकडे पाठवला आहे. महापालिका आयुक्त विपीन पालिवाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य सरकारने ऑगस्ट २०२३ मध्ये ‘पीएम ई-बस सेवा’ या नावाने केंद्र-प्रायोजित योजनेला मंजुरी दिली होती. ही योजना दोन श्रेणींमध्ये लागू केली जाईल. पहिल्या श्रेणीमध्ये शहर बस सेवा आणि संबंधित पायाभूत सुविधा आणि दुसऱ्या श्रेणीत ‘ग्रीन अर्बन मोबिलिटी इनिशिएटिव्ह’चा समावेश आहे.



# राहुल गांधी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड झाल्यामुळे केंद्र सरकारवर मोठा वचक

## जिल्हा काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया

आधुनिक केसरी न्यूज



**जालना :** देशाच्या 18 व्या लोकसभेत काँग्रेस पक्षाचे नेते आणि जनसामान्याचे खंबीर नेतृत्व खासदार राहुल गांधी यांची विरोधी पक्षनेतेपदि निवड झाल्यामुळे केंद्र सरकारवर मोठा वचक राहील अशी प्रतिक्रिया जालना जिल्हा काँगेस पदाधिकाऱ्याकडून व्यक्त करण्यात आली आहे. खासदार राहुल गांधी यांनी देशभरात नफरत छोडो भारत जोडो हे घोषवाक्य घेऊन भारत जोडो यात्रा काढली होती भाजप आणि संघी लोकांनी देशांमध्ये जातीय विष पेरून जाती-जातीमध्ये भांडणे लावून लोकांची मने दुभंगण्याचे काम केले होते परंतु खासदार राहुल गांधी यांनी देशाला सुरक्षित आणि समतेच्या विचारांशी बांधण्याचे काम करीत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे विचार शांती सद्भावना संयम ईश्वर अल्ला तेरो नाम सबको संमती दे भगवान या विचाराने प्रेरित केले आणि लोकांची दुभंगलेली मने जोडण्याचे महान कार्य केले आहे, भाजप प्रणित एनडीए सरकारवर आगामी काळात मनमानी आणि हुकूमशाही पद्धतीने त्यांना राज्यकारभार करता येणार नाही, खासदार राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते झाल्यामुळे त्यांच्यावर मोठा वचक राहणार आहे त्यामुळे देशातील जनतेला न्याय हक्क मिळण्याची आशा वाढली आहे खासदार राहुल गांधी हे देशाची प्रगती वाढती बेरोजगारी, प्रचंड वाढलेली महागाई, शेतकरी, कष्टकऱ्यांच्या जटिल समस्या, व्यापारावर होणारा अन्याय आणि दलित, आदिवासी, अल्पसंख्याक आणि ओबीसींच्या प्रश्नांवर लक्ष घालून न्याय देण्याचा प्रयत्न करतील अशी प्रतिक्रिया जालना जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख शहर जिल्हा काँग्रेसचे जिल्हाअध्यक्ष शेख मेहमूद कार्याध्यक्ष राजेंद्र राख तालुका काँग्रेसचे अध्यक्ष वसंत जाधव आदि पदाधिकाऱ्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहे.




# खचलेला रस्ता जणू नदीपाट भासे..!

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात : रेल्वे विभागाचा कानाडोळा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील शासकीय विश्रामगृहा लगत असलेल्या रेल्वे मार्गावर उड्डाण पूल उभारण्यात आला आहे.यावेळी पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी रेल्वे विभागाने स्वतंत्र नाली बांधकाम केले आहे. हा रस्ता पावसामुळे खचल्याने धोकादायक बनला असून गटारातील घाण पाण्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. खचलेला रस्ता जणू नदिपाट असल्याचा भास होतो आहे. शहरातुन जाणारा मूख्य रस्ता हा दक्षिण भारताला जोडणारा असल्याने वाहनांची मोठी गर्दी असते. याच रस्त्यावर रेल्वे विभागाने "फाटक " बसवीले होते. फाटक बंद झाल्यावर शहरातील आंबेडकर चौका पर्यंत वाहनांच्या रांगा लागुन वाहतूक खोळंबली जात होती.याचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत होता. दरम्यान हा रस्ता "राष्ट्रीय महामार्ग " म्हणून मंजूर करण्यात आला आहे.वाहनधारक व नागरीकाची होणारी गैरसोय लक्षात घेऊन रेल्वे फाटक येथे उड्डाण पूल उभारण्यात आला आहे.रेल्वे हद्दीतील बांधकामाची जबाबदारी त्यांनी स्वताह घेऊन काम पूर्ण केले आहे.ऊड्डाणपूला खाली भुयारी मार्ग उभारला आहे. या कामामुळे चांगली सूविधा मिळाली असली तरी त्या परिसरात पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी स्वतंत्र नाली बांधकाम करण्यात आली आहे.नुकत्याच झालेल्या पावसाने रस्ता खचला असून दुर्गंधी युक्त पाण्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.भुयारी मार्गात पाणी जाण्यासाठी सोय नसल्याने पाणी तूंबले आहे.भुयारी मार्गतुन येजा करणा-या वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो आहे. संबंधीत रेल्वे विभागाचे याकडे कमालीचे दुर्लक्ष होत असल्याने नागरीकात तीव्र संताप व्यक्त केला जातो आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ द्यावा

## अन्यथा आंदोलन : काँग्रेस पक्षाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पालिका हद्दीतील प्रधानमंत्री घरकुल आवास योजने अंतर्गत अनेक नागरिकांनी पालिकेकडे अर्ज केला. पात्र लाभार्थ्यांना मंजुरी मिळाली व घरकुल पूर्ण होवून देखील लाभ मिळत नसल्यामुळे लोहा काँग्रेस कमिटीच्या वतीने पालिका प्रभारी मुख्याधिकारी यांना निवेदन देवून लाभार्थ्यांना तत्काळ लाभाची रक्कम देण्यात यावी अन्यथा काँग्रेस पक्षाकडून आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. लोहा नगर परिषद कार्यालया अंतर्गत गरजू गोरगरीब नागरिकांसाठी शासनाकडून प्रधानमंत्री आवास योजना कार्यान्वित करण्यात आली. शहरातील नागरिकांनी पालिकेकडे रीतसर अर्ज करून पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजना मंजूर झाली. त्यानुसार बहुतांश लाभार्थ्यांनी भाड्याच्या घरात राहून तसेच व्याजी कर्ज काढून घरकुल उभे केले. परंतु घरकुल पूर्ण होऊन अनेक महिन्यांचा कालावधी उलटून देखील लाभार्थ्यांना त्यांच्या खात्यावर घरकुलाची थकित रक्कम जमा करण्यात आली नाही. सदरील थकीत रक्कम तात्काळ वितरीत करण्यात यावी अन्यथा काँग्रेस पक्षाकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काँग्रेस शरद पाटील पवार यांनी प्रभारी मुख्याधिकारी यांना निवेदनातून दिले आहे.

यावेळी काँग्रेस अल्पसंख्याक सेल चे जिल्हाउपाध्यक्ष अकबर मौलाना, युवक काँग्रेस अध्यक्ष सतीश पाटील शिंदे, आनंद पाटील आदींची उपस्थिती होती.




# बाजार सावंगी वीज केंद्रात अभियंत्याची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** बाजार सावंगी येथील ३३/११सबस्टेशन वीज केंद्रात गत तीनचार महिन्या पासून अभियंताचे पद रिक्त असुण अभियंता अभावी अनेक कामे खोळंबली तर वीज केंद्रा अंतर्गत सतत विजेची ये जा बंद चालू असा प्रकार सुरु आहे. यासंदर्भात दैनिकाने बातम्या द्वारे वीज महावितरण कंपनीला अवगत केले तरी चालढकल सुरु होती आखेर विभागा कडून अभियंता ची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती मिळाली. बाजार सावंगी तालुक्यातील मोठे व मुख्य बाजार पेठेचे गाव असुण येथे ३३/११ सबस्टेशन वीज केंद्र आहे.तर अभियंता सह अनेक वायरमन ऑपरेटर कर्मचारी कार्यालय अंतर्गत आहे. तर अनेक गावांचा वीज पुरवठा येथील वीज केंद्रांतर्गत होते. येथील अभियंताची गत तीन चार महिन्यांपूर्वी शिऊर येथे बदली होवून तेथून दुसरा अभियंता या कार्यालयात रुजू झाला तर त्यांने दोनतीन महिने येथे कर्तव्य बजावले परंतु नंतर अचानक त्याची बदली झाली की केली की काय? नाही माहित परंतु दोन तीन महिन्यांपासून येथे अभियंता पदाची जागा रिक्त असल्याने अनेक कामे खोळंबली तर वीजेच्या ये जा चालू बंद चा मोठा त्रास सहन करावे लागले प्रभारी म्हणून गदाना चे अभियंता देण्यात आले होते मात्र त्यांच्याकडून ही कामे चोख झाली नाही. शेवटी दैनिक सह सरपंच आप्पाराव पाटील नलावडे यांनी ही कार्यकारी अभियंता यांच्या कडे होणारा त्रास खोळंबलेली कामे बाबत पाठपुरावा केला. याची दखल घेत वीज केंद्राला पुणे येथून काळबांडे नामक अभियंताची नियुक्ती करण्यात आली असुण एक जुलैपासून ते कर्तव्य बजावणार आहे.



# पाळा येथे घरफोडी करून चोरटे फरार

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** तालुक्यातील मौजे पाळा येथे दि. २५ जून रोजी पहाटे एकाच रात्री दोन ठिकाणी धाडसी चोरी झाल्याच्या घटना घडल्या असून या घटनेत चोरट्यांनी २० हजाराची रोकड व १ लाख ११ हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. एकूण ३५ ग्रॅम सोने, १५० ग्रॅम चांदीचे दागीने चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मुखेड तालुक्यातील पाळा येथील फिर्यादी नागनाथ वापुराव पाटील यांच्या घराच्या भितींवरुन चोरट्यांनी आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या लोखंडी कपाटाचे लॉक तोडून एकूण ३५ ग्रॅम सोने, १५० ग्रॅम चांदीचे दागीने चोरुन नेले. यात सोन्याची ५ ग्रॅमची एक अंगठी, १० ग्रॅमचे मणी मंगळसुत्र, सोन्याची पोत व रोख १२ हजार रुपये चोरीला गेले. पाटील यांच्या घरावर हात साफ केल्यानंतर चोरट्यांनी आपला मोर्चा दुसरीकडे वळवला.याच गावातील प्रशांत पंढरीनाथ जलदावार यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश मिळविला. घरातील लोखंडी कोठीत ठेवलेले १५ ग्रॅमचे सोन्याचे नेकलेस, ५ ग्रॅमचे सोन्याचे झुमके, १५० ग्रॅमचे चांदीचे दागिने व ८ हजार रुपये रोख रक्कम चोरट्यांनी चोरून नेले. या दोन्ही घटनेत एकूण २० हजार रुपये रोख रक्कम व १ लाख ११ हजार रुपयाच्या दागिन्यांचा समावेश आहे. घटनेची माहिती मुखेड पोलिसांना मिळताच पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, पोलिस उपनिरीक्षक मंचक फड, एएसआय हणमंतराव वाघमारे, डिएसबी विभागाचे पांडुरंग पाळेकर, पोकॉ किरण वाघमारे, पोहेकॉ मनोज जोंधळे यांनी घटनास्थळी भेट दिली. नागनाथ बापूराव पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मुखेड पोलीस ठाण्यात कलम ४५७, ३८०,३४ भादंविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय हणमंतराव वाघमारे हे करीत आहेत.

# मुख्याध्यापकपदी वसंतराव चव्हाण यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** पं.जवाहरलाल नेहरु इन्स्टिटुट ऑफ एज्युकेशन सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी रिसर्च नांदेड संचलित पद्मभूषण वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय बिल्लाळी मुखेड येथील शाळेच्या मुख्याध्यापकपदी वसंतराव मारोतीराव चव्हाण यांना पदोन्नती देवुन मुख्याध्याकपदी नेमणूक करण्यात आली. निवड होताच संस्थेच्या वतीने व कर्मचा-यांच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन मुख्याध्यापक चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला.या निवडी बद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





# राममूर्ती येथील असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** राममूर्ती गावातील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी अजीस घोचीवाले यांना शिवसेनेच्या अल्पसंख्यांक आघाडीच्या तालुका संघटक पदावर नियुक्ती देण्यात आली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचा पक्षाच्या वतीने पुष्पहार घालून स्वागत केले. कार्यकर्त्यांनी सामान्य जनतेच्या सुखदुःखात सहभागी होऊन त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, शहरप्रमुख बाला परदेशी, शहरप्रमुख दुर्गेश कठोठीवाले, शहरप्रमुख घनश्याम खाकीवाले, शिवसेना अल्पसंख्यांक आघाडी तालुकाप्रमुख सय्यद अमीर, उपतालुकाप्रमुख रोशन पठाण, युवासेना तालुकाप्रमुख संदिप मगर, उपतालुकाप्रमुख रामचंद्र गायकवाड, सुरेशराव वाघमारे, बंडू केळकर, दिलीप गिराम, संतोष जमदडे यांच्या उपस्थिती होती. प्रवेशकर्ते फिरोज परसुवाले, राजिक घोचीवाले,अय्युब घोचीवाले, इरफान घोचीवाले, मेहबूब घोचीवाले, अब्दुल परसुवाले, अन्सार घोचीवाले, फारुक घोचीवाले, जलाल परसुवाले, फारुक परसुवाले, रऊफ घोचीवाले, अन्सार घोचीवाले, अशपाक घोचीवाले, अस्लम घोचीवाले, जुबेर घोचीवाले, अनिस परसुवाले, अमीर परसुवाले आदी युवकांनी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.

## कोतवाल पदभरतीसाठी 6 जुलै रोजी परीक्षा

### जालना शहरातील 14 परीक्षा केंद्रांवर होणार परीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील कोतवाल संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता सर्व तालुका निवड समितीकडून उक्त पदभरतीची प्रक्रिया केंद्रीय पद्धतीद्वारे पूर्ण करण्याबाबत सर्व उपविभागीय अधिकारी तथा अध्यक्ष, तालुका कोतवाल निवड समिती यांच्या सर्वानुमते सदर परीक्षा ही शनिवार, दिनांक 6 जुलै 2024 रोजी दुपारी 3.30 ते 5.00 या कालावधीत, जालना शहरातील 14 परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेण्यात येणार आहे.

यापूर्वी दि. 7 ऑक्टोबर 2023 रोजी कोतवाल पद भरतीसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेत झालेल्या गैरप्रकारामुळे पदभरती रद्द करण्यात आली होती. आता कोतवाल पद भरतीसाठी ही परिक्षा 6 जुलै 2024 रोजी होणार आहे. सदर पदभरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी दक्षता घेण्यात येत आहे. जालना शहरातील परीक्षा केंद्रांवर परीक्षेपुर्वी तसेच परीक्षेस बसल्यानंतर परीक्षार्थी यांची झडती / तपासणी करण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक तो पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देणेबाबत पोलीस प्रशासनास सुचित करण्यात आले आहे. परीक्षा केंद्रावर सीसीटिव्ही व वेबकास्टींक करणेबाबत नियोजन असून परीक्षेस येणा-या परीक्षार्थी यांची हॅण्डहेल्ड मेटल डिटेक्टरव्दारे तपासणी करण्यात येणार आहे. परीक्षार्थी यांनी परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या दिवशी दुपारी 1.30 वाजता उपस्थित राहवयाचे आहे. तसेच दुपारी 3.00 वाजेनंतर परीक्षा केंद्राचे मुख्य प्रवेशव्दार बंद करण्यात येणार असून त्यानंतर कोणत्याही परीक्षार्थी यांना परीक्षा केंद्रात प्रवेश मिळणार नाही यांची सर्व परीक्षार्थींनी नोंद घ्यावी.

परीक्षेचे हॉलटिकीट परीक्षार्थी यांना उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले असून त्यावर परीक्षार्थी यांना परीक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना नमूद केल्या आहेत. सर्व परीक्षार्थी यांनी परीक्षेस येतांना ओळखीबाबतचा प्रवेशपत्रात नमूद एक पुरावा सोबत बाळगणे आवश्यक आहे. त्याशिवाय परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. सदर परीक्षेची प्राथमिक उत्तरतालिका त्याच दिवशी सध्यांकाळी 6.00 वाजता HTTPS://JALNA.GOV.IN/JALNA.NIC.IN या जिल्हा संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. परीक्षार्थी यांना दुस-या दिवशी सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत संबंधित तहसिल कार्यालयात त्यावर आक्षेप सादर करता येईल. इतर ठिकाणी दाखल करण्यात आलेल्या आक्षेपांचा व तसेच मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही.

सदर परीक्षेची गुणवत्ता यादी दिनांक 7 जुलै 2024 रोजी निकाल प्रक्रिया पूर्ण होताच जाहिर करण्यात येईल याबाबत सर्व परीक्षार्थी यांनी नोंद घ्यावी, अशी माहिती अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली आहे



## छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पाहणीसाठी शिष्टमंडळ, आ. राजेश पवार दिल्लीला रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे**

**उमरी :** नायगाव तालुक्यातील शिष्टमंडळ आमदार राजेश पवार यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीला रवाना व तसेच सोबत गेलेले कार्यकर्ते. केशव हंबर्डे. गजानन हासेकर. मानसिंग वहिदे. आनंद शिंदे. खुशाल पाटील गणेश सूर्यवंशी राजेश मनुरकर बापूराव शिंदे बाळकृष्ण साप्ते रमेश सावंत गंगाधर शेषेराव पाटील पुयड गोविंद विक्रम थेटे विठ्ठल गाडे ओंकार सावंत दिलीप सावंत ज्ञानेश्वर पाटील सावंत अविनाश पाटील कदम शंकर पाटील गोरठेकर बालाजी दतराम ढगे बालाजी लक्ष्मण ढगे बापूसाहेब वेताळे राजीव ढगे दतराम अर्जुन जाधव अशोक सूर्यवंशी मारोतराव मनोरकर दत्ता हरी पवार गणेश अनमोल गजानन पाटील माधव जाधव साईनाथ ढेरे आकाश पुयड विठ्ठल पुयड गंगाधर पुयड शंकर कवळे लक्ष्मण कानगुलवार बालाजी सावंत बालाजी ढेरे रुस्तम बेलकर अमोल नाम गुलवार विठ्ठल पवार आकाश आयकुलवार शिवा पगलवाढ मारुती कवळे सिद्धेश्वर चंदापुरे आदी रवाना झाले पुढील वाटचालीस शुभेच्या देण्यात आल्या.

## बीडचे नवे जिल्हाधिकारी अविनाश पाठक

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** लोकसभा निवडणुकीमध्ये अनेक तक्रारी झाल्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांची बदली होईल अशी शक्यता होती. अखेर त्यांना बीडच्या जिल्हाधिकारी पदावरून हटवण्यात आले आहे. त्यांच्या जागी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांना जिल्हाधिकारी म्हणून पदभार देण्यात आला आहे.

लोकसभा निवडणुका संपल्यानंतर अधिकाऱ्यांच्या बदल्याचे वारे आता वाहू लागले आहे. बीडच्या जिल्हाधिकारी म्हणून वर्षभरापूर्वी आलेल्या दीपा मुधोळ मुंडे यांची कारकीर्द बीडमध्ये निराशजनक ठरली. महिला जिल्हाधिकारी म्हणून बीड जिल्ह्यात काहीतरी अमुलाग्र बदल करतील, अशी अपेक्षा दीपा मुंडे यांच्याकडून होते, परंतु लोकसभा निवडणुकीमध्ये झालेल्या आरोपांमुळे त्यांच्या तक्रारी वरिष्ठांकडे गेल्या होत्या, या सर्व बाबींच्या अनुषंगाने त्यांना तात्काळ बीडच्या जिल्हाधिकारी पदावरून हटवण्यात आला आहे. त्यांच्या जागी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांना जिल्हाधिकारी म्हणून पदभार देण्यात आला आहे. अविनाश पाठक यांना बीड जिल्ह्याचा चांगला अभ्यास असल्यामुळे त्यांच्याकडून बीड जिल्ह्याला खूप सारे अपेक्षा आहेत.

## शेतकरी कामगार पक्षाचा ९ जुलै रोजी मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यात उन्हाळ्यात व आत्ता पावसाळ्यात उरण विद्युत मंडळाने विजेचा सततचा खंडित प्रवाह करून नागरिकांच्या जिवाशी खेळ मांडला आहे. हजारों नागरिकांच्या वाढत्या तक्रारींचा विचार करून शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांचा उरण एमएसईबी कार्यालयावर भव्य निषेध मोर्चा आयोजित केला आहे,असे उरण तालुक्यातील एमएसईबी कार्यालयात शेकाप उरण तालुका चिटणीस विकास नाईक यांनी अर्ज देऊन जाहीर केले.शेकाप ज्येष्ठ नेते रायगड भूषण प्रा एल.बी. पाटील,उरण महिला चिटणीस सिमा घरत, रमाकांत पाटील, शहर महिला अध्यक्षा नयना पाटील, सिताराम नाखवा, विनोद पाटील, रंजना पाटील इ.शेकाप कार्यकर्ते उपस्थित होते. तालुक्यातील गावागावांतील विजेचे बरेच खांब जीर्ण झाले आहेत. विजेच्या तारा तुटल्या आहेत. पावसाळ्यात पडून मोठी जीवितहानी दाट शक्यता आहे. तसेच ग्राहकांना दिली जाणारी भरमसाठ बिले येत असल्याने नागरिक मेटाकुटीला आले आहेत. लोकात असंतोष माजला आहे. तरी नागरिकांना न्याय मिळविण्यासाठी हा मोर्चा निघणार आहे.आता हा मोर्चा जोरदार काढण्यासाठी कार्यकर्त्यांनी गावोगाव प्रचार पुढच्या आठवड्यापासून सुरू करण्याचे आयोजन केले आहे.

## सरस्वती माध्यमिक विद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** आज बुधवार दिनांक २६ जुन २४ रोजी सरस्वती माध्यमिक विद्यालय, आकुर्डी पुणे,३५ येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी झाली. इयत्ता सहावीच्या वर्गाकडे कार्यक्रम होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान संस्थेचे संस्थापक गोविंद दाभाडे सर यांनी स्वीकारले. प्राचार्या सौ.वाळुंज, उपप्राचार्य विजय बच्चे, पर्यवेक्षिका सौ.घावटे व सौ.गुरव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.प्रतिमा काळे यांच्या वर्गातील कुमारी मीरा मगर हिने तर सूत्र संचलन शिवम कांबळे याने केले. विघ्नेश सोळसे याने सुंदर बहारदार भाषण केले तसेच वैभव नेटके, श्रद्धा उघडे, आरोही कांबळे यांनीही भाषणे केली. शाळेतील शिक्षिका सौ.चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले तर सौ. गुरव मॅडम यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार सौ.भालेराव यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता झाली. जयंती निमित्ताने ६ वी अ वर्गात चित्रकला स्पर्धा सौ.प्रतिमा काळे मॅडम यांनी घेतली. १२ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. राजरत्न कांबळे प्रथम क्रमांक, श्रेयस तांबे द्वितीय क्रमांक, मीरा मगर तृतीय क्रमांक, साई माळे चतुर्थ क्रमांक, शिवम कांबळे पाचवा क्रमांक तसेच संस्कार मेनकर, आराध्या पवार, दिपल पाटील, मधूकुमारी निर्मलकर, संस्कृती भूरुक, धनश्री पाचारे, अंजली जगताप यांनीही सहभाग घेतला.सर्व विजयी विद्यार्थ्यांचे संस्थापक, प्राचार्या, उपप्राचार्य, पर्यवेक्षिका, पालक व वर्गशिक्षिका सौ.प्रतिमा काळे मॅडम यांनी शुभेच्छा दिल्या व भरभरून कौतुक केले.

# जिल्हा परिषद धुळे येथे मादक द्रव्य विरोधी दिवस साजरा

## छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** श्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरी केला जातो व ह्याच दिवशी आंतरराष्ट्रीय मादक द्रव्य सेवन विरोधी दिवस म्हणून साजरी केला जातो. त्याच अनुषंगाने जिल्हा परिषद येथील मुख्याधिकारी व सामाजिक न्याय विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्या माध्यमातून श्री छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली व मादक द्रव्य विरोधी दिवस म्हणून जिल्हा परिषद या ठिकाणी मादक द्रव्य चा पुतळा तयार करून त्या ठिकाणी जाळण्यात आला व त्या ठिकाणी सर्व आधिकारी कर्मचाऱ्यांनी व्यसनमुक्ती शपथ घेतली. या ठिकाणी उपस्थित श्री. चंद्रकांत पवार साहेब अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री एस.आकलाडे साहेब उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र),श्री. भदाणे सर उपमुख्य कार्यकारी अधिकारी, श्री गणेश मोरे साहेब उपमुख्य कार्यकारी अधिकारी, श्री मनीष पवार सर समाज कल्याण अधिकारी, श्री सिद्धार्थ नगराळे सर उपशिक्षक अधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते.



## छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या ब्राह्मण अधिवेशनास उपस्थित राहावे : सचिन वाडे

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** ब्राह्मण सभा भवन येथे ब्राह्मण अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष सचिन वाडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. छत्रपती संभाजीनगर येथे अखिल भारतीय पेशवा संघटनेतर्फे ब्राह्मण अधिवेशन दि.३० जुन २०२४ रोजी संपन्न होत आहे. या अधिवेशनात अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनास जालना जिल्ह्यातील ब्राह्मण समाजाने उपस्थित राहून ब्राह्मण समाजाची एकजूट दाखवावी. असे आवाहन स्वागताध्यक्ष सचिन वाडेपाटील यांनी केले आहे. दिवसभर संपन्न होत असलेल्या अधिवेशनात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस कल्याणराव देशपांडे,डॉ. सुभाष भाले,डॉ.संजय रुईखेडकर,रमेश देहेडकर , श्रीकांत शेलगावकर, डॉ. पवन देशमुख,महेश वझरकर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुलींचे मंजूर आयटीआय कार्यान्वित करण्यासाठी अधिवेशनात आवाज उठवणार

### आ. कैलास गोरंटयाल यांचा राज्य सरकारला इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** येथे मंजूर असलेले शासकीय मुलींचे आयटीआय नवीन ट्रेडसह तातडीने सुरू करावे यासाठी येत्या २७ जूनपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या अधिवेशनात आवाज उठवणार असल्याचा इशारा आ.कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.



राज्य शासनाच्या वतीने राज्यात मुलांसाठी असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (आयटीआय ) धर्तीवर मुलींसाठी देखील स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय ) सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेला आहे. याच पार्श्वभूमीवर सात वर्षांपूर्वी जालना येथे मुलींसाठी स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मंजूर करण्यात आलेली असून सदर संस्था कार्यान्वित करण्यासाठी शासन आणि जिल्हा प्रशासनाच्या स्तरावरून अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारच्या हालचाली करण्यात आलेल्या नाहीत. मुलांप्रमाणे मुलींनी देखील तांत्रिक कौशल्य आत्मसात करून त्यांना त्यांच्या पायावर उभे राहता यावे यासाठी तत्कालीन राज्य सरकारने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेत जालना येथे मुलींसाठी स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मंजूर केले आहे. मात्र, सदर प्रशिक्षण संस्था आजपर्यंत कार्यान्वित होऊ शकली नाही. राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाची उदासीन भूमिका यासाठी कारणीभूत असल्याचा आरोप आ.कैलास गोरंटयाल यांनी केला आहे. राज्यात अन्य जिल्ह्यात मुलींसाठी मंजूर करण्यात आलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) ज्या पद्धतीने कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर जालना येथे मंजूर करण्यात आलेले मुलींचे आयटीआय नवीन ट्रेडसह तातडीने सुरू करून मुलींवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी तसेच या प्रश्नाकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी विधिमंडळाच्या येत्या अधिवेशनात आवाज उठवणार असल्याचा इशारा आ.कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.



## राजश्री शाहू महाराजांना जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाविकास आघाडी व समविचारी लोकांच्या वतीने राजश्री शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्रीराम नगर येथे अभिवादन करण्यात आले या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जीव सेनेचे प्रमुख राजकुमार गाजरे यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या वेळी वॉर्डातील प्रतिष्ठित नागरिक संदीपान बापू काळे सुभाष पांडभरे पाटील,ज्ञानेश्वर खंदारे ,वल्लभ भंडारी विष्णू गुठाळ, अंकुशराव चौधरी पाटील दीपक म्हस्के, दशरथ मानवतकर, नाचन डोंगरकर, सुभाष शुक्ला, पत्रकार अतुल खंडगावकर, टोंपे मामा वारकरी संप्रदायाचे आण्णा,घाडगे बाबा सुभाष महालकर, डॉ राजेंद्र आव्हाड, कारभारी वाहूळ, तुकाराम साबळे पाटील, अरुण जाधव, हेमंत नरवडे, संभाजी ब्रिगेड वैभव बोडखे, विनायक पवार, विक्की ढगे आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे राजकुमार गाजरे,वैभव बोडखे, संदीपान बापू काळे यांनी शाहु महाराजांच्या राज्य कारभारावर प्रकाश टाकला. कार्यक्रमसाठी अतुल इंगळे, नागेश हिवराळे, सुभाष शुक्ला, चंदू काळे, सुरेश हिवराळे, हेमंत नरवडे, तुकाराम साबळे, गंगाधर आव्हाड यांनी परिश्रम घेतले.

## खोलेश्वर महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी मुला-मुलींची गर्दी वाढली

आधुनिक केसरी न्यूज




**अंबाजोगाई :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित खोलेश्वर महाविद्यालयात अकरावी, बारावी तथा वरिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी शहरासह ग्रामीण भागातून मुला-मुलींचा गर्दा वाढलेला दिसतो. गुणवत्तापुर्ण शिक्षणाची हमी आणि व्यक्तीमत्व विकासाचे संस्कार महाविद्यालयात मिळत असल्याने प्रवेश घेण्यासाठी इच्छुकांची गर्दी दिसते. दरम्यान पन्नास टक्यापेक्षा अधिक प्रवेशासाठी मुलींचे प्रमाण प्रचंड वाढण्यामागे कारण आपल्या लेकराच्या सुरक्षेची हमी इथे मिळत असल्याचा पालकांचा विश्वास. कनिष्ठ महाविद्यालय चालु झाल्या बरोबर सर्व शाखांचे वर्ग देखील अधिकृत चालु झाल्याची माहिती प्राचार्य डॉ.मुकूंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ.दिगांबर मुडेगावकर यांनी दिली. ग्रामीण भागात कॉप्या मोठ्या प्रमाणावर चालतात. शिवाय कॉलेजला शिकायला गेलं नाही तरी वर्षात फक्त परीक्षेला गेल्यानंतरही आम्ही पास होतोत याची खात्री 100 टक्के मिळत असल्याने ग्रामीण कॉलेज हाऊसफुल झाल्याचे दिसतात. अनेक कॉलेजला प्रवेश प्रश्न यक्ष असताना भाशिप्रच्या खोलेश्वर महाविद्यालयात मात्र अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेसाठी गर्दी वाढलेली दिसते. ज्या मुलांना कॉप्या करून शिक्षण घ्यायचं नाही, गुणवत्तेच्या आधारावर पुढे जायचं अशा मुलांच्यासाठी हे महाविद्यालय शैक्षणिकदृष्ट्या वरदान ठरत असुन इथे गैरप्रकार चालत नसले तरी तज्ञ आणि अनुभवी प्राचार्य, प्राध्यापकांचा असलेला संच ज्यामुळे गुणवत्तापुर्ण शिक्षणाला प्रचंड वाव मिळतो. इथे शिक्षण घ्यायचं म्हणजे आपला मुलगा काही तरी पुढे करून दाखवील याची खात्री देखील पालकांना वर्षानुवर्षापासुन पटलेली आहे. एवढेच नाही तर खोलेश्वर महाविद्यालयात केवळ शिक्षण नव्हे तर इथे मिळणारे संस्कार व्यक्तीमत्व वाढीसाठी महत्वाचे ठरतात. तशा प्रकारे मराठवाड्यात संस्थेचा नावलौकिक पसरलेला दिसतो.म्हणुनच प्रशासनात वेगवेगळ्या पदावर असलेले मोठे अधिकारी मागे वळुन पहाताना आम्ही भाशिप्रच्या संस्थेत शिकलो म्हणुन या पदापर्यंत पोहोचलो अशा प्रकारचा भाव प्रकट करताना दिसतात. यंदाचे शैक्षणिक वर्ष चालु झाल्यानंतर अनेक कॉलेजला प्रवेशाची चिंता कारण ग्रामीण भागातल्या कॉलेजमध्ये कॉप्या चलतात म्हणुन ओढा तिकडंच वाढलेला दिसत असला तरी या कॉलेजात कला, वाणिज्य, विज्ञान शाखेसाठी प्रवेश घेणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली असुन आतापर्यंत विज्ञान शाखेसाठी 200 आसपास प्रवेश झाल्याची माहिती उपप्राचार्य डॉ.दिगांबर मुडेगावकर यांनी दिली.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# भाजीपाल्याचे दर कडाडले..!

आधुनिक केसरी न्यूज

**भोकरदन :** तालुक्यातील तडेगाव येथे बुधवारी बरलेल्या आठवडी बाजारात भाजीपाल्याचे दर चांगलेच कडाडले होते गेल्या महिन्याभरापासून भाजीपाल्याचे दर वाढल्याने नागरिकांना चांगलाच आर्थिक फटका बसताना दिसत आहे. यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांकडून भाजीपाल्याची लागवड कमी झाली पाणी नसल्याने शेतकरी हैराण झाले आहेत लागवड घटल्याने आडवडी बाजारात आवकही कमी झाली आहे.त्यामुळे मागील काही दिवसांपासून भाजीपाल्याचे दर वाढलेले आहेत. भाज्यांचे दर चार पटीने वाढल्याने सर्व सामान्य नागरिक भाव वाढीने परेशान दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पाऊससामुळे काही प्रमाणात भाव कमी होतील अशी अश्या होती परंतु काही भाव कमी होण्याचे चित्र दिसत नाहीत. त्यातच कमालीचे वाढ होताना दिसत आहे आणखीन काही दिवस दर जैसे थे वसैच राहील असे एका व्यापाऱ्याने सांगीतले आहे. टोमॅटो, बटाटा, गवार,भेंडी,हिरवी मिरची,दोडके,कारले,आद्रक,कोथिंबीर, पाली ,मेथी,कोबी,चवळी,शेवगा,वागे,काकडी,चवळी,याचे दर सध्या गगनाला भिडले आहेत.सद्ध्या टोमॅटो 80 रूपये किलो,कोबी 120,रूपये कलो,,हिरवी मिरची 120 किलो,तर कोथिंबीर एक जुडी 30 रुपयांना विकत आहेत.आवक नसल्यामुळेच दर वाढलेले आहेत यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे भाजीपाल्याची लागवड कमी आहे परिणामी बाजारात आवक ही कमी आहे त्यामुळे दर गगनाला भिडले आहेत आता पाऊस पडत आहे त्यामुळे भाजीपाल्याची लागवड वाढेल आणी दर कमी होतील असे सांगण्यात येत आहे.

## नागपुरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** येत्या २४ तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये तसेच मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. यादरम्यान ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहतील. त्यामुळे हवामान खात्याने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. यावर्षी नैऋत्य मोसमी वारे वेळेआधीच महाराष्ट्रात दाखल झाले. जूनच्या पहिल्याच आठवड्यात राजधानी मुंबईसह अनेक शहरांमध्ये मोसमी पाऊस दाखल झाला. तर जूनच्या दुसऱ्या आठवड्यात विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये आणि प्रामुख्याने पश्चिम विदर्भात मोसमी पावसाने हजेरी लावली. वेळेआधीच दाखल झालेला मोसमी पाऊस आणि हवामान खात्याने यावर्षी अधिक पावसाच्या दिलेल्या अंदाजामुळे शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली. महाराष्ट्राच्या बहुतांश भागांमध्ये शेतीच्या कामांना वेग आला. त्यानंतर मात्र पावसाने चांगलीच दडी मारली. आठवडाभराहून अधिक काळ मोसमी पावसाने ब्रेक घेतला. त्यामुळे अनेक ठिकाणी तापमानात वाढ झाली आणि त्याचबरोबर उकड्यात देखील वाढ झाली. विदर्भात तापमानवाढ आणि उकाडा जर अधिकच होता. अरबी समुद्रामध्ये मोसमी पावसाच्या वाऱ्याने पुन्हा एकदा जोर धरला असून, हे वारे आता देशभरातील बहुतांश क्षेत्र व्यापताना दिसत आहेत. याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील मोसमी पावसाची समाधानकारक हजेरी असेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.



## अमली पदार्थ निषेध दिनानिमित्त व्यसन व गुन्हेगारीवर व्याख्यान आयोजित

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सहारा व्यसनमुक्ती केंद्र देवळाई चौक बीड बायपास येथे 26 जून जागतिक अंमली पदार्थ निषेध दिनानिमित्त आज मा. ब्रह्मा संताराम गिरी साहेब (पोलीस निरीक्षक) सातारा पोलीस स्टेशन छत्रपती संभाजी नगर, त्यांचे "व्यसन व गुन्हेगारी "या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते . यावेळी त्यांनी त्यांच्या 26 वर्षाच्या पोलीस सेवेतील व्यसनामुळे घडणारी गुन्हे व त्यामुळे होणारे संसाराची राख रांगोळी यावर उपचाराधीन रुग्ण मित्रांना जागृत केले.

"आग करून स्वयंपाक करायला शिका, व्यसन करून व गुन्हे करून इतरांच्या झोपड्या जाळू नका ? व्यसनमुक्त राहा, गुन्हे मुक्त रहा, निरोगी, आनंदी जगा हा संदेश त्यांनी आपल्या व्याख्यानातून तरुणांना दिला. जगण्याचे गणित हे मेंदूवर अवलंबून आहे असे प्रतिपादन .ब्रह्मा संताराम गिरी साहेबांनी केले. यावेळी अध्यक्षस्थानी सहारा व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक श्री.के के सोनवणे उपचाराधीन रुग्ण मित्रांचे नातेवाईक व बहुसंख्या तरुण रुग्ण मित्रांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रांचे कार्याध्यक्ष सुनील बढे,सूत्रसंचालन समुपदेशक. शिल्पा थोरात तसेच आभार ऋषिकेश काकर (सोशल वर्कर ) यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी सागर काळे, संदीप इंगळे, सौरभ ढोणे,सविता येवले, कल्पना गायकवाड आदींनी पुढाकार घेतला.

## पैनगंगा नदीत बुडून तिघांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** उमरखेड तालुक्यातील ढाणकीपासून जवळच असलेल्या सावळेश्वर येथे पैनगंगा नदीवर धुणे धुण्यासाठी गेलेल्या दोन मुली बुडाल्या. त्यांना वाचविण्यासाठी दोन तरुणांनी नदीपात्रात उडी घेतली. मात्र दोन मुलींसह एका तरुणाचा बुडून मृत्यू झाला. ही घटना बुधवारी दुपारी घडली. कावेरी गौतम मुनेश्वर (१५), अवंतिका राहुल पाटील (१४), चेतन देवानंद काळबांडे (१६), सर्व रा.सावळेश्वर, ता.उमरखेड, अशी मृतांची नावे आहेत. या घटनेमुळे संपूर्ण सावळेश्वर गावावर शोककळा पसरली आहे.

सावळेश्वर येथे मामाच्या घरी आलेली कावेरी व तिची मैत्रीण अवंतिका या दोघी गावाजवळून वाहणाऱ्या पैनगंगा नदीवर धुणे धुण्यासाठी गेल्या होत्या. धुणे आटोपल्यानंतर या दोघीही अंघोळीसाठी पाण्यात उतरल्या. पाण्याचा अंदाज न आल्याने या दोघी खोल पाण्यात बुडू लागल्या. त्यांनी मदतीसाठी टाहो फोडला. त्यांची आरडाओरडा ऐकू आल्याने याच ठिकाणी असलेले चेतन देवानंद काळबांडे आणि शुभम सिद्धार्थ काळबांडे हे दोन तरुण मदतीसाठी धावले. या दोघांनीही नदीपात्रात उडी घेतली. घाबरलेल्या कावेरी आणि अवंतिकाने वाचवण्यासाठी आलेल्या चेतनला घट्ट पकडून ठेवले. त्यामुळे या तिघांचाही बुडून मृत्यू झाला. घटनेची माहिती कळताच गावकऱ्यांनी नदीपात्राकडे धाव घेतली. शुभमला वाचविण्यात गावकऱ्यांना यश आले. चौघांनाही नदीतून बाहेर काढून ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले. डॉक्टरांनी कावेरी, अवंतिका आणि चेतन यांना मृत घोषित केले. प्रथमोपचारानंतर शुभमला यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले आहे.

## लोकनेत्या पंकजाताई मुंढे यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याने तक्रार दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** भाजपाचे राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्याबद्दल सोशल मिडियावर आक्षेपार्ह वक्तव्य केल्या प्रकरणी २५ जून रोजी हिंगोली येथे श्री संत भगवान बाबा युवक संघटनेच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस उपअधीक्षक गृह विष्णुकांत गुष्ठेयांना निवेदन देण्यात आले. संबंधित समाज कंटकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली. या निवेदनावर भगवान बाबा युवक संघाचे जिल्हाप्रमुख गोपाल बांगर, जिल्हा संघटक शिवाजीराव घुगे, जिल्हा कार्याध्यक्ष पत्रकार शिवाजीराव बांगर, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख रवि गुढे आदी घुगे, जिल्हा प्रवक्ता प्रा. गजानन बांगर यांच्यासह मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर